| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक ३०६ वा | बुधवार दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### कळंब येथून मोटारसायकलची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रविंद्र जनार्धन वाकुरे, वय ४५ वर्षे, रा. कोथळा ता. कळंब ह.मु. एस टी कॉलनी डिकसळ ता. कळंब जि. धाराशिव यांची अंदाजे ३५,००० किंमतीची मोटरसायकल ही ि अंबीका मशीन टुल्स दुकान ढोकी रोड कळंब समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- रविंद्र वाकुरे यांनी दि.२३.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२)अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सत्तरहजाराची म्हैस अज्ञाताने चोरली

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गोपाळ महादेव बागल, वय ४५ वर्षे, रा. सांगवी मार्डी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे सांगवी मार्डी येथील शेत शिवार येथुन एक म्हैस अंदाजे ७०,००० किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी गोपाळ बागल यांनी दि.२३.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### उमरगा बसस्थानकातून सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मनिषा नागेश मुळे, वय ३५ वर्षे, रा. सराटी ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.२३.०२.२०२६ रोजी पंढरपुर ते हैद्राबाद बसने अणदुर ते उमरगा प्रवासादरम्यान बसस्थानक उमरगा येथे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवुन मनिषा यांचे पर्स मधील २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अंदाजे ५०,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मनिषा मुळे यांनी दि.२३.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### उमरगा येथून मोटारसायकलची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी `- संदिप दादाराव वडदरे, वय ३१ वर्षे, रा. कराळी ता.उमरगा जि. धाराशिव यांचीअंदाजे ५०,०००किंमतीची होंडा युनिकॉर्न मोटरसायकल ओम मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल उमरगा ते पार्किंगमधून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- संदिप वडदरे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२)अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**

## सर्वसमावेशक महिला जिल्हा संनियंत्रण समिती बैठक

# महिला व बालकांना योजनांचा लाभ देऊन त्यांच्या समस्यांची तातडीने सोडवणूक करा : जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार



धाराशिवधी २३ फेब्रुवारी (जिमाका) महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांच्यासाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ त्यांना दिला पाहिजे.सोबतच महिला व बालकांच्या प्रश्नांची तातडीने सोडवणूक करून त्यांना न्याय मिळवून दिला पाहिजे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित सर्वसमावेशक महिला जिल्हा संनियंत्रण समितीच्या बैठकीत अध्यक्षस्थानावरून श्री.पुजार बोलत होते.यावेळीअपर पोलीस अधीक्षक श्रीमती.शफकत आमना,महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी देवदत्त गिरी,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास,प्रभारी जिल्हा महिला बालविकास अधिकारी किशोर गोरे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री.पुजार म्हणाले की,सखी वन स्टॉप सेंटरच्या माध्यमातून कौटुंबिक हिंसाचाराला आळा घालण्यासोबतच बालविवाह रोखण्याचे काम करण्यात येत आहे. पीडित महिला व बालकांचे समुपदेशन देखील करण्यात येते तसेच त्यांना वैद्यकीय मदत करून इतर सेवांचा लाभ देऊन त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करण्यात येते.

बालकांचे संगोपनासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना राबविण्यात येत आहे.हुंडा प्रथा आणि कौटुंबिक हिंसाचार यासारख्या सामाजिक समस्यांबाबत कायदेशीर जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम होत असल्याचे श्री.पूजार यावेळी म्हणाले.

श्री.गोरे यांनी सांगितले की,सखी वन स्टॉप सेंटरच्या माध्यमातून जुलै २०२५ जानेवारी २०२६ या कालावधीत कौटुंबिक हिंसाचाराची २७ प्रकरणे,बाल लैंगिक शोषणाची तीन,बालविवाहाची ८ व इतर ८४ यासह अन्य एकूण १२५ प्रकरणे निकाली काढण्यात आली.याच सेंटरच्या माध्यमातून १३२ समुपदेशन,६ पोलीस मदत,२३ वैद्यकीय मदत/ समुपदेशन,१२ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,७ आश्रय/ स्वाधार गृह,२ संरक्षण अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आलेली दोन प्रकरणे आणि ८१ इतर सेवा/पुनर्वसन सेवेचा लाभ देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम व कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ या विषयावरही सभेत चर्चा करण्यात आली.महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ६८० बचत गटांना ३२ कोटी ८० लक्ष ५१ हजार रुपये बँक कर्ज वाटप केले असून कर्ज वसुलीचे प्रमाण ९८.७० टक्के असून या बँक कर्जातून बचत गटांच्या महिलांनी कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय, हळद लागवड, तुती लागवड, रेशीम कोष निर्मिती, मसाले पापड व्यवसाय, दाल मिल,भाजीपाला लागवड, रेडीमेड गारमेंटसारखे व्यवसाय सुरू केल्याची माहिती माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी यांनी दिली.

बेटी बचाव बेटी पढाव हे अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.या अभियानाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती श्री.गिरी यांनी यावेळी दिली.

या सभेत निरीक्षणगृह/बालगृह समिती,बालकल्याण समिती,मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत जिल्हा बाल संरक्षण समिती,जिल्हा कृती दल, (बालविवाह प्रतिबंध)प्रायोजकत्व आणि प्रतिपालकत्व मंजूर समिती व जिल्हा पुनर्वसन समिती तसेच जिल्हा परिविक्षा समितीच्या कामकाजाची माहिती यावेळी देण्यात आली.

# कुष्ठरोग नियंत्रणात राज्यात पहिला क्रमांक; धाराशिवची उल्लेखनीय कामगिरी






धाराशिव, दि. २३ फेब्रुवारी (जिमाका) : सन २०२५-२६ या वर्षात राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल धाराशिव जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.राज्यस्तरावर एप्रिल २०१५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील कामाचे मूल्यमापन करण्यात आले असून त्यामध्ये नव्या रुग्णांचा शोध, रुग्ण सहवासीतांना दिलेली पीईपी (रिफाम्पीसीनची एक मात्रा), डीपीएमआर सेवा,विकृती पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया तसेच निर्देशांकानुसार काम या सर्व बाबींचा विचार करण्यात आला.

या मूल्यमापनात धाराशिव जिल्ह्याला प्रथम,सातारा जिल्ह्याला द्वितीय तर चंद्रपूर जिल्ह्याला तृतीय क्रमांक देण्यात आला.जिल्ह्यातील उल्लेखनीय कार्यामुळे धाराशिवची 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.या पुरस्कारासाठी सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. मारुती रामराव कोरे यांची निवड करण्यात आली असून त्यांचा सन्मान करण्यात आला.

पुरस्कार वितरण समारंभ २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मंत्रालय,मुंबई येथे पार पडला.यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव,राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे संचालक उपस्थित होते.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरीदास,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.बनसोडे,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.फुलारी, उपजिल्हा रुग्णालय कळंबचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.धर्माधिकारी तसेच कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमातील कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी वेळोवेळी वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या बैठका घेऊन मार्गदर्शन केले.तालुका आरोग्य अधिकारी,वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी,आशा कार्यकर्त्या तसेच कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमातील कर्मचाऱ्यांनी नियमित रुग्ण शोध मोहिमा प्रभावीपणे राबविल्या.

या यशाबाबत संदेश देताना डॉ. मारुती कोरे यांनी सांगितले की, कुष्ठरोग कर्मचाऱ्यांचे अथक प्रयत्न, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, जिल्हा शल्यचिकित्सक,उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय यांचे सहकार्य यामुळेच हे यश प्राप्त झाले आहे.लवकर निदान,नियमित उपचार,सहवासीतांचा शोध व वेळेत दिलेली पीईपी यामुळे जिल्ह्यातील सर्व नवीन रुग्ण विनाविकृती अवस्थेत शोधण्यात यश आले असून सर्वांचे त्यांनी अभिनंदन केले.

शासनाने दिलेले 'शून्य कुष्ठरोग प्रसार' हे उद्दिष्ट निश्चितच साध्य करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.शासनाने सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी समाजात दडून राहिलेले नवीन रुग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचार देणे तसेच नजीकच्या सहवासीतांना पीईपी देणे हे प्रमुख कार्य आहे.यामुळे रोगप्रसाराची साखळी खंडित होण्यास मदत होणार आहे.

सन २०२५-२६ मध्ये जानेवारी २०२६ अखेर ३९५ नवीन रुग्ण शोधून त्यांच्यावर बहुविध औषधोपचार सुरू करण्यात आले असून सर्व नजीकच्या सहवासीतांना पीईपी देण्यात आली आहे.नोव्हेंबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात आलेल्या 'कुष्ठरुग्ण शोध अभियानात' १४१ नवीन रुग्ण आढळले. तसेच ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'स्पर्श कुष्ठरोग जनजागृती पंधरवडा' राबविण्यात आला.

या पंधरवड्यात नियमित व विशेष सर्वेक्षणाद्वारे बिट भट्टी कामगार, खडी केंद्र कामगार,उसतोड मजूर, आश्रमशाळा व निवासी वसतीगृहातील विद्यार्थी,कारखाना कामगार,स्थलांतरित लोकसंख्या आदी दुर्लक्षित गटांची तपासणी करण्यात आली.एकूण २३,७५२ नागरिकांची तपासणी करून ५७१ संशयित रुग्ण शोधण्यात आले. त्यापैकी ३१ नवीन रुग्णांचे निदान निश्चित करून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले.या ३१ रुग्णांपैकी धुळे-१,जळगाव-१, अहिल्यानगर-५,लातूर-१, बीड-३, नाशिक-१ आणि मध्यप्रदेश-७ असे एकूण १९ रुग्ण बाहेरील जिल्हे/राज्यांतील असल्याचे निदर्शनास आले.

एकही नवीन रुग्ण उपचारांपासून वंचित राहू नये यासाठी शासनाने कुष्ठरोग 'नोटिफायबल डिसीज' म्हणून जाहीर केला आहे.त्यामुळे खाजगी दवाखान्यात नवीन रुग्ण निदान झाल्यास त्याची माहिती आरोग्य विभागास देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

रुग्ण लवकरात लवकर शोधून उपचारावर आणता यावेत व विकृती टाळता याव्यात यासाठी खालील लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन तपासणी व उपचार घ्यावेत, असे आवाहन डॉ.मारुती कोरे यांनी केले आहे.

# मातृभाषेचा गौरव : २७ फेब्रुवारीला 'मराठी भाषा गौरव दिन' कार्यक्रम

धाराशिव दि.२४ फेब्रुवारी (जिमाका) ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या २७ फेब्रुवारी या जयंतीदिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून,मराठी भाषा ज्ञानभाषा व्हावी यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले आहेत.त्यांच्या कार्याचा सन्मान आणि स्मरण म्हणून त्यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याचे मुख्य धोरण मराठी भाषा विभागाने निश्चित केले आहे.

या उपक्रमाची मध्यवर्ती संकल्पना घेवू या एकच वसा, मराठीला बनवू या ज्ञानभाषा अशी असून,विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषेचा गौरव करण्यात येणार आहे.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव येथे जिल्ह्यातील मराठी भाषा साहित्यिकांच्या सहभागातून 'मातृभाषेचे व्यक्तीगत व समाजजीवनातील स्थान' या विषयावर मराठी भाषा साहित्य परिसंवाद व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचा लाभ जिल्ह्यातील नागरिकांनी घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांची जनावरे चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांच्या ताब्यात

## आठ म्हशी व दोघ पोलीसांचे ताब्यात, म्हैस चोरीचे एकूण १३ गुन्हे उघडकीस

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-दि २०.०२.२०२६ रोजी मौजे लासोना शिवारातील एका शेतकऱ्याच्या ०५ म्हशी चोरीस गेलेबाबत पोस्टे बेंबळी येथे अज्ञाताविरूदध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.या बाबत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, धाराशिव अशाच प्रकारचे जनावरे चोरीचे अनेक गुन्हे दाखल असल्याने श्रीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक, धाराशिव यांनी अशा प्रकारचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांना आदेशित केले होते.सपोनि कासार व पथक यांना गोपनीय बातमीदाराकडून प्राप्त माहितीवरून नेकनूर जि बीड येथील एक संशयित इसम व वाहन या चोरीचे परीसरात येवून गेला असल्याची माहिती मिळून आली. त्यांनी तात्काळ इसम नामे चंद्रकांत जगन्नाथ नन्नवरे, रा नन्नवरे वस्ती, नेकनूर, ता जि बीड यास नेकनूर येथून ताब्यात घेवून त्याचेकडे चौकशी केली असता त्याने दिलेल्या माहितीवरून त्याचा अन्य एक साथीदार शंकर सुरेश चव्हाण रा ढोकी, यास ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींनी यापुर्वीही येवती, लासोना, बेंबळी, कोंड, तुळजापूर, काटी सावरगाव, सांगवीमार्डी, सुरतगाव, वैराग, माणकेश्वर शिवार या ठिकाणावरून म्हशी चोरी केल्या असल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून एकूण ०८ म्हशी, गुन्हे करतेवेळी वापरलेले वाहन महिंद्रा पिकअप व हिरो स्प्लेंडर असा एकूण १२,१५,००० रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.नमुद आरोपींनी धाराशिव जिल्हयातील एकूण १३ म्हशी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली असून पोलीस आरोपीचे अन्य साथीदारांचा व म्हशींचा शोध घेत आहेत. नमुद आरोपी व जप्त मुददेमाल पुढील कारवाईस्तव पोस्टे धाराशिव ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कामगिरी मा. श्रीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक धाराशिव मा. श्रीमती शफकत आमना अपर पोलीस अधिक्षक धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, पोह शौकत पठाण, पोह प्रकाश औताडे, पोह जावेद काझी, पोह फरहान पठाण, चापोह रत्नदिप डोंगरे, नागनाथ गुरव यांचे पथकाने केली आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## काटकसर हीच बचत..

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू आहे. या अधिवेशनात आगामी अर्थिकवर्षाचे बजेट मांडले जाईल. आगामी वर्षातील आर्थिकमान्यतेबरोबर गत वर्षातील बाबीचा विचार केला जातो. विधीमंडळातील सर्वच सदस्य या बाबत चर्चा करीत असतात. लोकशाहीत दरवर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशन होत असते. राज्याचे व केंद्राचेही असते. काय स्वस्त व काय महाग होणार याकडे जनतेचे लक्ष लागून असते. प्रत्यक्षात महागाई कमी होत नाही. कमी केलेले दर किंवा जशासतसे असणाऱ्या दरात कमी होताना दिसून येत नाहीत. एखाद्या वस्तूचे दर कमी झाले तरी तरी प्रत्यक्षदर्शी त्याचा फायदा होताना दिसून येत नाहीत. त्यामुळे जनसामान्य जशी आर्थिक काटकसरीची तरतुद करीत असते त्यानुसार सरकारनेसुद्धा करण्यांची गरज आहे. तसे सरकारला सांगण्याची गरज नाही. सरकारकडे सल्ला देणारे अनेकजन असतात. तरी अर्थसंकल्प दरवर्षी मांडतो, तो लोकशाहीत मांडावाच लागतो. या मध्ये असे दिसून येते की, मागील व आगामी काळात विचार यामध्ये दिसून येतो. दुसरी बाब अर्थसंकल्पानुसार नियोजन होते का? हाही विचार केला पाहिजे. दरवर्षी अर्थसंकल्पा मांडला जातो. नवीन योजनेस तरतुद केली जाते. अर्थिक तरतुदीनुसार वर्षभर ठरल्याप्रमाणे होते का? यावर चिंतन होणे अपेक्षित असते. आर्थिकवर्षाच्या अंतिम दोन-तीन महिण्यात असलेली तरतुद जी खर्चि न झालेती तर खर्ची करण्यात सपाटा दिसून येतो. त्यामुळे योग्य नियोजन होत नाही. ज्या कामास खर्च अपेक्षित असतो त्यावर होणे अपेक्षित असते मात्र तसे होताना दिसून येत नाही. राज्यात आर्थिक तोटा सतावत असेल तर काटकसर करावी लागते. तसे आपल्या राज्यात कमी प्रमाणात दिसून येते. अधिकारी व कार्यालयास चारचाकी गाड्याचा, त्यावरील इंधनाचा मोठा खर्च होतो. कार्यालयात कोणीही नसताना संगणक, पंखे किंवा विद्युत लाईटींग चालू असतात. त्यामुळे कारण नसताना खर्चात भर पडते. ही जाणीव शासकिय कार्यालयातील प्रत्येकात असली पाहिजे. सध्याला अनेक ठिकाणी प्रशासकिय इमारती उभा आहेत. या प्रशासकिय कार्यालयात कधी वरिष्ठांनी जर भेट दिली तर अनेक बाबी कळतात. सध्याला वरिष्ठांची कधी प्रशासकिय ईमारतीत फिरकत नाहीत त्यामुळे मनमानेल तसे काही अधिकारी कर्मचारी वागताना दिसून येतात. मुळात आपल्या राज्यात कधी आर्थिक बचत केली असे दिसून येत नाही. नको त्या बाबीत कात्री लावली पाहिजे. शासनाने वृत्तपत्रात दिल्या जाणाऱ्या जाहिरातीत कात्री लावली. दहा कामाची निविदा या वेबसाईटवर पाहावी. मुळात दहा कामे कोणती आहेत. ती कोणत्या भागातील कामे आहेत. त्याचे मुल्य किती आहे.हा एक शासनाचा प्रचार होतो. त्यात अधिक पारदर्शता येते. या विरोधात असे की, एक पुल बांधला, पाण्याची टाकी बांधली एका महिण्यात जमीनोदस्त होते. पडते, नष्ट होते. त्यामुळे आलिकडे पारदर्शता दिसून येत नाही. पारदर्शतेला प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. पुर्ण निविदा वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली पाहिजे किमान कामांची नावे, यादी असली पाहिजे. कोणत्या भागातील आहेत हे जनतेला कळले पाहिजे. एका-एका कामासाठी लाखोंचा खर्च होत असेल तेच जनतेला कळत नसेल तर काय उपयोग? त्यामुळे अर्थसंकल्पात आता ठोस बाबी विचारात घेतल्या पाहिजेत. जबाबदार कोणाला धरले पाहिजे या बाबत पक्का निर्णय असावा. सध्याला चुकीचे झाले तरी जबाबदार धरत नाहीत. आर्थिक घोटाळा झाला, पारदर्शनेनुसार काम झाले नाही तर आपल्यादेशात कठोर शिक्षा नाही. त्यापेक्षाही मोठी बाब आर्थिकघोटाळा घडल्यास शिक्षेची तरतुद मोठी नाही किंवा कोणाला जबाबदार धरावे या बाबत स्पष्ट निर्देश दिसून येत नाहीत. त्यामुळे आर्थिकपाया हा मजबुत दिसून येत नाही. अर्थसंकल्पात आता काही नवीन बाबीची गरज आहे. मजबुत, सक्षम असा अर्थसंकल्प असला पाहिजे. अर्थसंकल्पात जनसामान्य व त्याचा विकास हा केंद्रबिंदु मानला पाहिजे. काही झाले तरी राज्याचा विकास इतर राज्यापेक्षा वेगळा दिसला पाहिजे. जनतेचा पैसा कोणत्याही परिस्थितीत वाया जावू न देणे या बाबत काळजी घेतली पाहिजे. यावेळी राज्याचा अर्थसंकल्प हा मुख्यमंत्रीच स्वतः मांडणार आहेत. त्यामुळे तो योग्यच असेल असे वाटते. काही झाले तरी देशात काही बाबी महत्त्वाच्या आहेत. त्या म्हणजे आरोग्य, शिक्षण व शेती कृषी! या याबाबीवर अधिक तरतुद असली पाहिजे. त्याच बरोबर वर्षभर या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे. कोणत्याही स्थितीत दुर्लक्ष होता कामा नये. त्याच प्रमाणे गतकाळापासून तरतुद करतात, त्यातील काही योजना ह्या तशाच रेंगाळल्या आवस्थेत असतात. त्यामुळे कितीतरी पटीने खर्च वाढलेला असतो. अशा स्थिती बाबत विचार होणे अपेक्षित आहे. मुळात नियोजन महत्त्वाचे आहे. नियोजनाअभावी योजना यशस्वी होत नाहीत. त्यामुळे राज्यात आगामी वर्षासाठी तरतुद करताना गतवेळीचा अनुभव व झालेला खर्च, त्याच प्रमाणे प्रलंबित कामासाठी लागणारा खर्च त्याची तरतुद या बाबत विचार झाला पाहिजे. अनेक योजना गतवर्षीच्या अपुऱ्या निधीअभावी रेंगाळल्या आहेत. योजना पुर्ण होईल याच हिशोबाने तरतुद करणे आवश्यक आहे. कमी तरतुदीची कामे हाती घेतली जावू नयेत तशा सुचनाच दिल्या पाहिजेत. मुळात आपल्या राज्यात अपुरा विकास बऱ्याच ठिकाणी दिसून येत आहे. पाटबंधाऱ्याची कामे बऱ्याच प्रमाणात झालेली आहेत. शिक्षणसाठी अनेक ठिकाणी शाळेची इमारती बांधल्या आहेत. आता सर्वाधिक लक्ष कृषी विभागाकडे देण्याची गरज आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान कशाप्रकारे उंचावेल या बाबीकडे लक्ष द्यावे लागेल. यासाठी भरपूर काही करावे लागले तरी ते करावे. यासाठी मोठ्या तरतुदीची गरज आहे. सर्वात वाईट बाब म्हणजे सर्वाधिक शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. व्यापारी, कारखानदार किंवा उद्योगपतीचे प्रमाण अल्प आहे मात्र शेतकऱ्यांचे अधिक आहे ही बाब नजरेआड करून चालणार नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तरतुद शेतकऱ्यासाठी करणे अपेक्षित आहे. राज्याचा अर्थसंकल्प यावेळी मुख्यमंत्री मांडणार आहेत त्यामुळें मुख्यमंत्र्यांना राज्यातील कृषीची माहिती चांगली आहे. पुर्वीमांडलेल्या अर्थसंकल्पापेक्षा यावेळी वेगळेपना असला पाहिजे. तो निश्चित दिसून येणार आहे. त्यामुळे आगामी वर्षाची तरतुद करतांना मागील तरतुदीचा गांर्भीयाने विचार करावा. ठोस अशी तरतुद करून कृषीसाठी लाभदायक अर्थसंकल्प ठरावा.

# न्याय आपल्या दारी: मोफत कायदेशीर मदतीची संकल्पना आणि महत्त्व

भारतीय लोकशाहीमध्ये कायद्याचे शासन या सिद्धांताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याचा मूलभूत आशय असा की राज्यातील सर्व व्यक्ती, संस्था आणि शासनसत्ता ही कायद्याला आधीन असते आणि कोणालाही कायद्यापेक्षा वरचे स्थान नसते. यासाठी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत समानता म्हणजेच कायद्यापुढीलच नव्हे तर सामाजिक आणि आर्थिक पातळीवर ही सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होय. याचसोबत न्याय सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हे तत्व ही लोकशाही व्यवस्थेचा मूलधार मानला गेला आहे

राज्यघटनेच्या संदर्भात कायद्याची शासन समानता आणि न्यायप्रवेशनाचा हक्क हे तिन्ही परस्पर पूरक आणि अविभाज्य तत्वे मानले जातात परंतु केवळ कायद्याचे राज्य घोषित करणे पुरेसे नसून या कायद्याखाली सर्व नागरिकांना समसमान वागणूक मिळणे अत्यावश्यक आहे. जर कायद्या पुढील समानता प्रत्यक्ष व्यवहारात साध्य करायचे असेल तर प्रत्येक नागरिकाला न्यायप्रवेशनाची सुलभ उपलब्धता असणे अनिवार्य ठरते कारण न्यायप्रणालीपर्यंत पोहोचण्याची आर्थिक सामाजिक आणि संरचनात्मक अडचण राहिली तर समानता केवळ कागदावरील घोषणेतच अडकून राहते.

न्याय हा सर्वांना सहज व रास्त उपलब्ध झाला पाहिजे समाजातील सर्व स्तराच्या लोकांना आपापली हक्क ही न्यायप्रणालीमार्फत बजावता आली पाहिजे म्हणून संविधानातील कलम ३९ अ राज्याला असे निर्देश देतो की आर्थिक दुर्बलतेमुळे किंवा सामाजिक असमानतेमुळे कोणत्याही नागरिकास न्यायप्रवेश नाकारला जाऊ नये. या उद्दिष्टाच्या अंमलबजावणीसाठी विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ हा कायदा लागू करण्यात आलेला आहे

द लीगल सर्विसे अथॉरिटीज ॲक्ट १९८७ या कायद्याने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, प्रत्येक राज्यासाठी राज्य विधी सेवा प्राधिकरण, जिल्ह्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या विधी सेवा पुरविण्यासाठी प्रस्थापित केले आहेत कायद्याच्या जागृती मधून लोकांच्या बळकटीकरणाकडे वाटचाल करण्यासाठी शासनाने राष्ट्रीय स्तरापासून तालुकास्तरापर्यंत अशी एक सुसज्ज आणि भव्य अशी यंत्रणा उभी केली आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ही संस्था भारतीय न्यायव्यवस्थेतील तळागाळातील लोकन्यायाची वाहक म्हणून ओळखली जाते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हा केवळ प्रशासकीय घटक नसून, संविधानिक मूल्यांची अंमलबजावणी करणारा सामाजिक परिवर्तनाचा साधक आहे. विधी सेवा प्राधिकरण व्यवस्था ही भारतीय न्यायव्यवस्थेतील केवळ प्रशासकीय रचना नसून ''न्याय सर्वांसाठी'' या संविधानिक ध्येयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी प्रभावी यंत्रणा आहे.

न्यायप्रवेशातील आर्थिक आणि सामाजिक अडथळे दूर करून समतेवर आधारित न्यायव्यवस्था घडविण्यात या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

या कायद्याचा मुख्य हेतू हा समाजाच्या अक्षम घटना घटकातील लोकांना मोफत आणि सक्षम कायदेशीर सेवा पुरवणे हा आहे जेणेकरून आर्थिक व इतर कारणांमुळे ते न्याया पासून वंचित राहणार नाहीत. इतर नागरिकांना विधी सेवा या सहज उपलब्ध करून घेता येतात पण समाजातील गरीब दुर्बल व निरक्षर लोकांना होणारा खर्च, लागणारा वेळ, प्रक्रिया व अन्य अडचणीमुळे न्यायालयापर्यंत पोहोचता येत नाही. हीच दरी मीटविण्यासाठी या प्राधिकरणांची आवश्यकता आहे. न्याय हा मोफत व सहज उपलब्ध करून देता आले तरच सर्वांना समान न्याय हे तत्व पाळता येईल.

फक्त न्यायप्रणालीच नाही तर आपल्या कल्याणकारी राज्यामध्ये दुर्बल घटकांच्या सक्षमीकरण व मुख्य प्रवाहामध्ये समाविष्ट करण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना व विशेष कार्यक्रम राबवले जातात मात्र निरक्षरतेमुळे या योजनांची माहिती अनेक जणांना नसते त्यामुळे अनेक लोक त्यांच्या हक्क व अधिकारांपासून वंचित राहतात.

याच्या प्रयोजनासाठी या कायद्याच्या कलम (४) मध्ये प्राधिकरणांची विविध उद्दिष्टे नमूद केलेली आहेत त्यामध्येच कायदेशीर साक्षरता पुरवणे लोकांना कायदेशीर जागरूक करून शिक्षित करणे त्यांचे हक्क फायदे व शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना मार्फत आलेल्या विशेष अधिकारांबद्दल त्यांना सजग करणे हा आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी स्थानिक पातळीवर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**(१) अर्ज स्वीकारणे आणि पात्रता पडताळणी:**

नागरिक न्यायसहाय्यासाठी अर्ज सादर केल्यानंतर, जिल्हा प्राधिकरण त्यांची पात्रता कायद्यानुसार तपासते. उदा. उत्पन्न मर्यादा, सामाजिक वर्गलिंग, वय, अपंगत्व, सामाजिक परिस्थिती हे निकष ठराविक आणि पारदर्शक असतात.

**(२) वकील नियुक्ती व मार्गदर्शन:**

पात्र नागरिकांसाठी अनुभवी वकीलांची नियुक्ती केली जाते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वकील पॅनेल तयार करून त्याचे नियमित पुनरावलोकनही करते. नियुक्त वकील केवळ न्यायालयीन प्रतिनिधित्वच करत नाहीत, तर प्रकरणाशी संबंधित कायदेशीर प्रक्रिया, अधिकार आणि उपलब्ध पर्यायांविषयी अर्जदारास सतत मार्गदर्शन आणि सल्ला देतात. यामुळे न्यायप्रवेशन अधिक कार्यक्षम व नागरिकाभिमुख होते.

**(३) लोकन्यायालयांचे आयोजन:**

जिल्ह्यातील विविध न्यायालयांमधील प्रलंबित प्रकरणे लोकन्यायालयांत हलवून तडजोडीने निपटवली जातात. यामुळे वेळ, खर्च आणि मानसिक ताण या तिन्ही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात बचत होते. लोकन्यायालयांमुळे समाधानकारक आणि टिकाऊ तोडगे निर्माण होण्याची शक्यता अधिक असल्याने ही यंत्रणा सामाजिक न्यायाची प्रभावी साधनरूप ठरते

**(४)कारागृह व संस्थांमधील कायदेशीर मदत :**

तुरुंगातील कैदी, महिला आश्रयगृहे, बालसुधारगृहे येथे जाऊन प्रत्यक्ष भेटी घेतल्या जातात. समितीचे प्रतिनिधी या संस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन समस्यांची माहिती घेतात, प्रकरणांची स्थिती समजून घेतात आणि आवश्यक त्या कायदेशीर उपाययोजना सुचवितात. ही सेवा विशेषतः महत्त्वाची आहे कारण अशा अनेक व्यक्तींना न्यायालयापर्यंत स्वतंत्रपणे पोहोचणे शक्य नसते.

**(५) जागरूकता मोहिमा:**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ग्रामीण व शहरी भागात कायदे शिबिरे, पंचायत स्तरावरील बैठक, शालेय कार्यक्रम, आयोजित करते या मोहिमांद्वारे नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची, कायदेशीर उपाययोजनांची आणि मोफत कायदेशीर मदतीच्या तरतुदींची माहिती दिली जाते

**कलम १२ अंतर्गत खालील व्यक्तींना मोफत कायदेशीर सेवा मिळण्याचा अधिकार आहे:**

**(अ)** अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीतील सदस्य

**(ब)** मानव तस्करीचे किंवा भिकारीपणाचे बळी (संविधानातील कलम २३ नुसार)

**(क)** महिला किंवा मुले

**(ड)** दिव्यांग व्यक्ती (दिव्यांग व्यक्ती अधिनियम, १९९५ नुसार)

**(ई)** अन्यायकारक परिस्थितीत असलेले लोक, जसे की:

सामूहिक आपत्तीचे बळी
जातीय हिंसाचाराचे बळी
जातीय अत्याचाराचे बळी
पूर, दुष्काळ, भूकंप किंवा औद्योगिक आपत्तीचे बळी

**(फ)** संरक्षणगृह, बालगृह, मानसिक रुग्णालय किंवा तुरुंगात असलेले लोक

**(ग)** अल्प उत्पन्न गट सर्वोच्च न्यायालयासाठीः वार्षिक उत्पन्न ₹५,००,००० पेक्षा कमी वा इतर न्यायालयांसाठीः राज्य सरकारने ठरविलेली मर्यादा (राज्यानुसार बदलते)

वरील कायद्याअंतर्गत लातूरच्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत भव्य अशा कायदेविषयक महाशिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रूक्मिणी मंगल कार्यालय, लक्ष्मीप्रयाग बैंक्वेट, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल समोर, औसा बार्शी रिंग रोड लातूर येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजना, कायदे व कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. तसेच विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा प्रशासन लातूर चे विविध विभागा मार्फत संबंधीत लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत विविध विभागांच्या वतीने वेगवेगळे स्टॉल्स उभारण्यात येणार असून, नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या स्टॉल्सवर योजनांबाबत माहिती, अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे. सदरील महा शिवीरास मा. न्यायमूर्ती श्री. एस.जी. चपळगांवकर न्यायमूर्ती उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायमूर्ती न्यायीक जिल्हा लातूर, मा. न्यायमूर्ती श्रीमती वैशाली पाटील-जाधव, न्यायमूर्ती उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायमूर्ती न्यायीक जिल्हा लातूर, मा. श्री. एस.जे. भारूका प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश लातूर तथा मा. अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर तसेच मा. श्री. व्ही. एन. गिरवलकर-सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर व इतर मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

**-डॉ. शुभांगी व्ही. पांचाळ**
**सहयोगी प्राध्यापक, दयानंद विधी महाविद्यालय, लातूर**

# लातूरच्या शैक्षणिक वैभवात दयानंद शिक्षण संस्थेचा सिंहाचा वाटा; महापौर जयश्री सोनकांबळे यांचे गौरवोद्गार



**लातूर/प्रतिनिधी :** ''लातूरच्या जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला, त्यातून मला जनसेवा करण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजते. दयानंद शिक्षण संस्थेने निर्माण केलेला गुणवत्तेचा 'लातूर पॅटर्न' आज देशभर प्रसिद्ध असून, आधुनिक काळातही ही संस्था विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने सक्षम करत आहे. विशेषतः रात्र अभ्यासिका, मोफत चहा-पाणी यांसारख्या सोयी-सुविधा, युवक महोत्सवातील दैदिप्यमान यश आणि विविध स्पर्धांमधील उत्तम कामगिरी यावरून येथील विद्यार्थी सर्वगुणसंपन्न आहेत हे सिद्ध होते. ऑनलाइन शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांसाठी तज्ज्ञ शिक्षकांचे मिळणारे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थी भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज होत आहेत. गुणवत्तेला आणि विद्यार्थ्यांच्या कल्याणाला दिले जाणारे हे महत्त्व अत्यंत कौतुकास्पद आहे,'' असे प्रतिपादन लातूर शहराच्या नूतन महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने नूतन महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे आणि उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे यांचा विशेष सत्कार सोहळा दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी होते. यावेळी उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, दयानंद शिक्षण संस्थेचा माझ्या जडणघडणीत मोलाचा वाटा असून, येथील पदाधिकाऱ्यांच्या कार्याचे संस्कार आपल्यावर झाले आहेत. आमदार अमितभैय्या देशमुख यांनी दिलेल्या संधीचे सोने करून शहराच्या विकासाचा वारसा अधिक निष्ठेने पुढे नेण्याचा आपला ठाम संकल्प असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी यांनी प्रास्ताविक केले. महापौर व उपमहापौर हे दयानंद शिक्षण संस्थेच्या कुटुंबाचेच अविभाज्य घटक असल्याचे नमूद करून, शहराचा सांस्कृतिक वारसा जपणे तसेच लोकप्रशिक्षण व लोकशिक्षणावर संस्थेने दिलेला भर नूतन पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून अधिक प्रगल्भ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ''संस्थेने केवळ पदवीधर घडवले नाहीत, तर समाजाचे नेतृत्व करू शकतील असे सुजाण नागरिक निर्माण केले आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिका आणि दयानंद संस्था यांचे हे जिव्हाळ्याचे नाते भविष्यात अधिक दृढ होईल,'' असेही ते यावेळी म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांनी नूतन महापौर व उपमहापौरांचे अभिनंदन केले. लातूरचा सांस्कृतिक वारसा पुढे नेण्यासोबतच रस्ते दुरुस्ती तसेच नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांचे तातडीने निराकरण करणे ही नूतन पदाधिकाऱ्यांची प्राथमिकता असावी, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. ''सत्ता ही जनतेची सेवा करण्याचे साधन आहे, त्यामुळे सामान्यांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून पारदर्शक कारभारावर भर द्यावा. दयानंद

शिक्षण संस्थेची शिस्त आणि मूल्यांची शिदोरी तुमच्या भावी राजकीय प्रवासात मार्गदर्शक ठरेल,'' असे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी अध्यक्षीय भाषणातून केले.

या सत्कार सोहळ्यास संस्थेचे उपाध्यक्ष श्री. ललितभाई शाह, श्री. रमेशकुमार राठी, संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी, सहसचिव श्री. अजिंक्य सोनवणे यांच्यासह सर्व नियामक मंडळातील सदस्य व महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी उपप्राचार्य श्री. अनिलकुमार माळी यांनी केले, तर डॉ. मनीषा अष्टेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# महाराष्ट्र शासनाचा ''वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न'' राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर




**धाराशिव/प्रतिनिधी :** तालुका आरोग्य व्यवस्थेच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाचा अत्यंत मानाचा ''वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न'' राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार तालुका आरोग्य कार्यालय, धाराशिव यांना प्रदान करण्यात आला. तालुका सुपरवायझर श्री तानाजी क्षीरसागर यांना दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित भव्य व गौरवशाली सोहळ्यात मा. मुख्यमंत्री व राज्याचे आरोग्यमंत्री यांच्या हस्ते एक लाख रुपये रोख पारितोषिक, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री तानाजी क्षीरसागर हे तालुका आरोग्य कार्यालयात तालुका सुपरवायझर म्हणून मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद गिरी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कार्यरत असून, धाराशिव तालुक्यात आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, सर्वसमावेशक व लोकाभिमुख करण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

विशेष म्हणजे, मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद गिरी यांनी आरोग्य विषयक कामे प्रभावीपणे कशी राबवावीत, कामाचे सूक्ष्म नियोजन कसे करावे, तसेच विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी कशी करून घ्यावी याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्या मार्गदर्शनाचा आदर्श अंगीकार करून श्री तानाजी क्षीरसागर यांनी धाराशिव तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये नियोजनबद्ध कार्यक्रम आयोजित करत शासनाने दिलेली उद्दिष्टे शंभर टक्के पूर्ण करून घेतली.

सन २०२४ ते २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य कार्यालयांमध्ये सहा राष्ट्रीय कार्यक्रमांसह शासनाच्या विविध आरोग्य उद्दिष्टांची यशस्वी पूर्तता करण्यासाठी त्यांनी व्यापक नियोजन केले. गावागावांत आरोग्य शिबिरे, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिरे, क्षयरोग, कुष्ठरोग, अंधत्व व हत्तीरोग निर्मूलन मोहिमा, राष्ट्रीय लसीकरण, मातृत्व संवर्धन दिन, स्वच्छता अभियान, साथरोग प्रतिबंध, वारकरी पालखी व यात्रा आरोग्य नियोजन, वृक्षारोपण तसेच आरोग्य जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. या सातत्यपूर्ण व परिणामकारक कार्यामुळे धाराशिव तालुका आरोग्य कार्यालयाला राज्यात प्रथम क्रमांकाचा मान मिळाला.

या उल्लेखनीय यशानिमित्त तालुका आरोग्य कार्यालयात मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद गिरी यांच्या हस्ते श्री तानाजी क्षीरसागर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिपक व्हटकर, सुरेश गंगावणे,श्री संजय माने, श्री सचिन तटाळे, श्री दिपक जाधव, श्री विकास आकोसकर, श्री अमोल साळुंखे, श्री अमित गाडे, श्रीमती चैताली पवार व श्रीमती स्नेहा पेठे उपस्थित होते.या अभिमानास्पद कामगिरीबद्दल श्री तानाजी क्षीरसागर, मा. तालुका आरोग्य अधिकारी तसेच सर्व आरोग्य कर्मचारी यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या समर्पित सेवाभावाचे सर्वत्र कौतुक व्यक्त केले जात आहे.

# कॅम्पसमधूनच राजकारणाची नवी पिढी निर्माण होईल; खासदार अनुराग सिंह ठाकूर यांचे मत : १५ व्या भारतीय छात्र संसदेचा समारोप




**पुणे/प्रतिनिधी :** धोरणनिर्मिती, प्रशासन आणि सार्वजनिक सेवेतील गुंतागुत समजून तरुणांनी राजकीयदृष्ट्या कुशल, प्रशासन जाणकार आणि सामाजिक दृष्ट्या संवेदनशील बनविण्यासाठी कॅम्पसमधूनच एक नवी पिढी निर्माण होऊ शकते. राजकारणाला शुद्ध करण्यासाठी नवीन आणि सक्षम प्रतिभावान युवकांनी राजकारणात प्रवेश करावा. असे आवाहन लोकसभा खासदार व माजी केंद्रीय मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट, पुणे यांच्या वतिने आयोजित करण्यात आलेल्या १५ व्या भारतीय छात्र संसदेच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी माजी खासदार व ज्येष्ठ पत्रकार शाहिद सिद्दीकी आणि राज्यसभा खासदार डॉ. संदीप कुमार पाठक हे सन्मानीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष आणि छात्र संसदेचे संस्थापक डॉ. राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस आणि सीएओ डॉ. प्रसाद खांडेकर उपस्थित होते.यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५व्या भारतीय छात्र संसदेला पाठविलेल्या शुभेच्छा पत्राचे वाचन करण्यात आले. अनुरागसिंह ठाकूर म्हणाले, लोकशाही, नेतृत्व आणि सार्वजनिक धोरण याबरोबरच केवळ एआय नैतिकतेची उपेक्षा करु शकत नाही. २१ व्या शतकात कॅम्पस मधून कॅबिनेटमध्ये जाण्याचा विचार करत असाल तर एआय नैतिकतेशी जुळवून घेतले पाहिजे. मानवीय दृष्टीकोनासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तंत्रज्ञानाची शक्ती म्हणजे एआयची शक्ती यावर शिखर परिषदेचे आयोजन केले होते.

गेल्या १० वर्षांमध्ये शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडला आहे. यामध्ये आयआयटी, आयएमएम, कॉलेज, युनिव्हर्सिटी यांच्या संख्येत वृद्धि झाली आहे. आत्मनिर्भर भारतासाठी सेमीकंडक्टर, हेल्थकेअर व अन्य क्षेत्रातील अतुलनीय वृद्धी होत आहे. विरोधकांना राजकारण करावयाचे असेल तर तर्क आणि तथ्यांच्या आधारे राजकारण करावे.

शाहिद सिद्दीकी म्हणाले, विश्वगुरू बनण्यासाठी युवकांनी स्वतःला सशक्त बनवा. तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्तेवर अवलंबून राहू नये. युवकांनी केलेल्या आंदोलनामुळेच या देशात परिवर्तनाची लाट आली आहे. त्यात जेपी मुव्हमेंट सारख्या अनेक चळवळीचा सहभाग आहे. युवकांनी जाती-पातीच्या भिंती तोडून देश विकासासाठी कार्य करावे. देशाला बदलायचे असेल तर सर्वात प्रथम युवकांनी मानसिकता बदलावी. लोकशाही म्हणजे देशातील सर्व नागरिकांना एक सारखा न्याय, कायदे आणि एकसारखी वागणूक आहे.

डॉ. संदीपकुमार पाठक म्हणाले, कॅम्पस टू कॅबिनेट बद्दल अनेक गैरसमज आहेत. विद्यापीठांमध्ये निवडणूका होणे गरजेचे असून येथील होणाऱ्या डिबेटच्या माध्यमातून उत्कृष्ट नेते तयार होतील. मूल्याधिष्ठित राजकारण गरजेचे असून देशाचे भविष्य निश्चित आहे. त्यातूनच विकास होईल. देशातील सर्व शिक्षण संस्थेच्या तत्परतेच्या माध्यमातूनच देशाचे भविष्य घडू शकते.

डॉ. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले, करप्शन, कास्टीझम, कम्युनलायझेशन आणि कलोनियल माइंड सेट बदलणे गरजेचे आहे. भारतीय छात्र संसद ही लोकशाहीमध्ये नेतृत्वाची संधी प्रदान करणारा एक उपक्रम आहे. राजकारणाचे प्रशिक्षण देणारी ही पहिली शैक्षणिक संस्था आहे. आमचा प्रयत्न चांगल्या आणि सुशिक्षित तरुणांना राजकारणात आणण्याचा आहे. विद्यार्थी दिपक कुमार पांडे, पूर्वी गंजीवाले, प्रताप पुंडे, उदय शर्मा, नेहाली चावडीकर यांनी आपले मांडले.कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस यांनी स्वागत पर भाषण केले.




# शेतीचे प्रकार



शेतकऱ्याने जीवन साधन मिळविण्यासाठी किंवा धंदा म्हणून स्वतःच्या शेतावर चालविलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने शेतीची व्याख्या करता येईल. शेतामधून काढावयाच्या उत्पादनावरुन शेतीचे ऊसमळा, भात शेती, पशुधन प्रधान शेती, मत्स्य शेती इ. निरनिराळे प्रकार अस्तित्वात आलेले आहेत. तसेच सिंचनाच्या उपलब्धतेनुसार बागायती शेती, जिराईत शेती असेही प्रकार पडतात. खतांच्या वापरानुसार सेंद्रिय शेती, रासायनिक शेती असे प्रकारसुद्धा अस्तित्वात आले आहेत. स्थूलमानाने नैसर्गिक आणि आर्थिक घटकांमुळे शेतीच्या प्रकारात बदल होतात.

नैसर्गिक किंवा प्राकृतिक घटक हे वर्षावर्षाला बदलत नाहीत. त्यांच्यातील सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हवामान, जमीन आणि भूरचना हे होत. एखाद्या विवक्षित विभागात कोणते पीक येऊ शकेल हे या घटकावर अवलंबून असते. कमी पावसाच्या प्रदेशात जर सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले तर बागायीत कपाशी आणि उसासारखी दीर्घमुदतीची पिके उत्तमरीतीने येऊ शकतात. त्या ठिकाणी अशा तृहेने पूर्वी अस्तित्वात नसलेला असा शेतीचा व्यवहार्य प्रकार निर्माण होऊ शकतो. भात शेती आणि उष्ण-कटिबंधातील फळबागांची शेती कोकणात शक्य आहे. कारण तेथील हवामान भात, आंबे, नारळ, काजू, सुपारी, मसाल्याची पिके याच्या उत्पादनाला पोषक असते. नवीन संकरित जातींमुळेही हवामान, जमीन व भूरचना ह्यांना योग्य अशी पिके आता घेता येतात.पिके आणि शेतीचा प्रकार हे जमीन आणि भूरचना यांवर अवलंबून असतात; पण या घटकांना जर पर्जन्यमानाचीही जोड मिळाली तर त्यांचे परिणाम अधिक उठावदार दिसतात. खोल, सुपीक आणि सपाट जमीन असेल आणि पाऊस भरपूर व चांगला विभागून पडणारा असेल तर तेथे शेतीची भरभराट झालेली आढळते. डोंगराळ आणि पुरेशा पर्जन्यमानाच्या प्रदेशात गवताळ राने मुबलक असल्याने अशा ठिकाणी सर्वसाधारणपणे कुरणशेती, वनशेती, गवतशेती किंवा पशुधन प्रधान शेती फायदेशीर ठरते. माफक खोलीची जमीन व तुटपुंजा पाऊस असणाऱ्या प्रदेशांत शेती किंवा जिराईत शेतीशिवाय पर्याय नसतो.

या प्रकारच्या शेतीत विविध प्रकारची फळे ही प्रमुख उत्पादनाची बाब असते. कोकणातील हवामान आणि पर्जन्यमान आंबा, नारळ, काजू, **(क्रमशः उद्याच्या अंकात)**

# मुलांतील व्यक्तिमत्त्व विकास



धेसर षी लहळश्रवीशपसध्याच्या काळात ङ्गव्यक्तिमत्त्व विकासफ हा शब्द बराच ऐकिवात येतो. व्यक्तिमत्त्व विकासाचा संबंध हा उच्चशिक्षण, खेळात, कलेत प्राविण्य मिळवणे हया गोष्टींशी लावला जातो. मग मनात असा विचार येतो की, व्यक्तिमत्त्व विकासाचे एवढेच पैलू आहेत का? व्यक्तिमत्त्व विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या १५ दिवसांच्या किंवा महिन्यांच्या शिबीरांच्या कालावधीत व्यक्तिमत्त्व विकास होऊ शकतो का? मुलाला समजू लागल्या पासून व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. आजूबाजूला असलेल्या परिस्थितीचा व घडणा-या घटनांचा मुलांवर परिणाम होत असतो व त्यातून मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते.

आता व्यक्तिमत्त्व घडविणे म्हणजे काय करणे? मुलांची अभ्यासात उत्तम प्रगती असणे, खेळात प्राविण्य असणे, एखादया कलेत प्राविण्य मिळवणे असे आहे का? पण हयातून ज्या मुलांना हया गोष्टी जमतात साहजिकच त्यांना प्रत्येक गोष्टीत यश मिळत गेल्यामुळे आपल्याला यश हे मिळणारच अशी ठाम समजूत होते व त्या मुलांकडून पालकांच्या व समाजाच्या अपेक्षा वाढतात. प्रत्येक वेळी यश मिळेलच अशी भावना वाढीस लागते व त्यातून फाजील आत्मविश्वास वाढत जातो. अशावेळी कधी अपयश आले तर ते अपयश स्वीकारण्याची मनाची तयारी नसते. त्यातून निर्माण होणारे ताणतणाव हे अटळ असतात. हया ताणतणावांना मुलं समर्थपणे तोंड देऊ शकतात का? ह्याचे रूपांतर हट्टीपणात होते. एक ही बाजू, तर दुसरी बाजू हया गोष्टी मुलांना जमल्या नाहीत तर त्या मुलांमध्ये निर्माण होणारा न्यूनगंड- त्यातून मुलांमधे हाणारी तुलना- हया तुलनेतून अपयश मिळाले तर मुलं आपला न्यूनगंड लपवण्यासाठी एक तर आक्रमक बनतात किंवा प्रत्येक गोष्टीत माघार घेऊन ती गोष्ट न करण्याकडे त्यांचा कल होत जातो. व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टिकोनातून शारीरिक, मानसिक, बौध्दिक, भावनिक, आरोग्य हयांचे निकोप संवर्धन होणे हे महत्वाचे पैलू मानता येतील. पतंजली मुनींनी सांगितलेल्या ङ्गअष्टांग-योगाफ्ची ढोबळ मानाने दोन विभागात विभागणी होते.



# रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी



पालेभाज्या, संपूर्ण धान्य आणि फायबरयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करा. गोड पदार्थ, प्रक्रिया केलेले अन्न (ीिर्शीीशव षेव) आणि साखरेचे सेवन टाळा. दिवसभर पुरेसे पाणी प्या, नियमित व्यायाम करा आणि नियमित शुगर लेव्हलची तपासणी

साखर/डायबिटीज नियंत्रणासाठी आरोग्यदायी टिप्स:

आहारातील बदल: आहारात फायबरचे प्रमाण वाढवा, जसे की पालेभाज्या, कडधान्ये, आणि ताजी फळे. पांढरा भात आणि मैद्याऐवजी ब्राऊन राईस किंवा ज्वारी/बाजरीची भाकरी खा.गोड पदार्थांवर मर्यादा: साखर, मिठाई, गोड पेये, आणि ज्यूस पूर्णपणे टाळा. लपलेली साखर (हळववशप ींसिरी) असलेल्या पॅकेज्ड पदार्थांपासून सावध रहा.

नियमित व्यायाम: दररोज किमान ३० ते ४५ मिनिटे वेगाने चालणे, योग किंवा व्यायाम करा. यामुळे रक्तातील साखर वेगाने कमी होण्यास मदत होते.

पाण्याचे प्रमाण: दिवसभरात पुरेसे पाणी प्या. डिहायड्रेशनमुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. नयमित तपासणी: सकाळी रिकाम्या पोटी (ऋीिंळपस) आणि जेवणानंतर रक्तातील साखर तपासा. सामान्य उपाशीपोटी साखर १०० ास/वङ पेक्षा कमी असावी.

लक्षणे ओळखा: वारंवार लघवी होणे, खूप तहान लागणे, थकवा आणि जखमा भरून न येणे ही उच्च साखरेची लक्षणे असू शकतात.तणावमुक्त रहा: मानसिक तणावामुळे शुगर लेव्हल वाढू शकते, त्यामुळे योगा किंवा मेडिटेशन करा.

# लाचखोरी कशी रोखणार?



सरकारी कार्यालयात प्रत्येक कामासाठी कायद्याने कालमर्यादा निश्चित केल्यास आणि वेळेत काम न पूर्ण केल्यास संबंधित अधिकार्‍याला त्यासाठी जबाबदार धरावे. त्यामुळे नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होतील आणि भ्रष्टाचारास लगाम बसेल.

अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील वादग्रस्त स्टिंग ऑपरेशननंतर त्यांचे खासगी सचिव डॉ. रामदास गाडे यांना लाच घेतल्याच्या आरोपातून त्या पदावरून तात्काळ कार्यमुक्त करण्यात आले. या प्रकरणाची चर्चा विरते न विरते तोच बीडमधील परळीत तेथील तहसीलदार लाच प्रकरणात अडकल्याची घटना उघडकीस आली आहे. तक्रारदारास प्रमाणपत्र देण्यासाठी पन्नास हजाराची लाच मागताना त्याला पकडण्यात आले. मुंबईतही एका वरिष्ठ पोलीस अधिकार्‍याला लाचप्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. असे लाचखोरीचे प्रकार उघड होणे हे नवीन नाही. सरकारी कार्यालयात कामे वेळेत न होणे हा सर्वसामान्यांचा नित्याचा अनुभव आहे. कामे त्वरित होण्यासाठी किंवा नियमात न बसणारी कामे करण्यासाठी लाच देण्या घेण्याचे प्रकार सर्रास घडत असतात. यापूर्वी लाचखोरीला आळा बसावा आणि लाचखोरांविरोधात तक्रारी करण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे या उद्देशाने जनजागृती मोहिमा राबवल्या गेल्या. महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या ताज्या अहवालानुसार लाचखोरीचे चित्र कायमच चिंताजनक राहिले आहे. गेल्या वर्षाभरात राज्यात ६८२ भ्रष्टाचाराचे गुन्हे नोंदवण्यात आले. अशा प्रकरणात नऊशेहून अधिक व्यक्तींना अटक करण्यात आली; मात्र दाखल झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात आरोपपत्र दाखल होण्याचे प्रमाण अगदीच नगण्य राहिले आहे, तर गुन्हा सिद्ध होण्याचे प्रमाणही अगदीच किरकोळ आहे.

महसूल विभाग आघाडीवर

सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार हा खूपच चिंतेचा विषय आहे. पंतप्रधान मोदी यांची 'ना खाऊंगा ना खाने दुंगा' ही तर अतिशय लोकप्रिय ठरलेली घोषणा होती; मात्र भ्रष्टाचार न थांबता उलट वाढला असल्याचेच चित्र आहे. सरकारी विभागात महसूल विभाग, पोलीस विभाग आणि शिक्षण व आरोग्य विभाग हे भ्रष्टाचारातील आघाडीवर असलेले विभाग आहेत. पैसे दिल्याशिवाय सरकारी कामेच होत नाहीत. लाच देण्यात नागरिकांनाही काही वाटेनासे झाले आहे. अनेक सरकारी कार्यालयात कामे होण्यात क्लिष्ट प्रक्रिया असतात. सामान्य माणसाला कामाची घाई असते, त्याचा फायदा घेऊन सरकारी अधिकारी पैशाची मागणी करतात. भ्रष्ट अधिकार्‍यांना राजकीय पाठबळ मिळते. अशा कर्मचार्‍यांवर कारवाई करण्यात प्रशासनही कचरते. भ्रष्टाचाराबद्दल गुन्हा दाखल झाल्यानंतरही हे खटले वर्षानुवर्षे चालतात, तोपर्यंत पुरावे नष्ट होतात, साक्षीदार फिरतात. त्यामुळे क्वचितच कोणाला शिक्षा होते. कायद्यातील पळवाटा आणि राजकीय पाठबळ त्यामुळेही गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरत नाही. खरे तर लाचखोरीची कीड केवळ कायद्याचे नव्हे, तर प्रशासकीय सुधारणा, तंत्रज्ञानाचा वापर आणि सामाजिक मानसिकतेत बदल याद्वारेच रोखता येईल. गेल्या काही वर्षांत सरकारी सेवामध्ये डिजिटलायजेशन झाल्यामुळे, बहुतांश सेवा ऑनलाईन झाल्याने लाच देण्याघेण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान सवलती याचे लाभ थेट बँक खात्यात जमा होऊ लागल्यानेही मधल्या साखळीतील भ्रष्टाचार कमी झाला आहे. यात अधिक प्रमाणात सुधारणा झाल्यास लाचखोरीला आळा बसू शकेल. भ्रष्टाचाराचे खटले त्वरित गतीने न्यायालयात सहा महिन्याच्या आत निकाली निघाल्यास भ्रष्टाचार रोखता येईल. गुन्हा सिद्ध झाल्यावर केवळ दंडाची किंवा तुरुंगवासाची शिक्षा देण्यापेक्षा मालमत्ता जप्तीसारखे उपाय योजण्याची गरज आहे. भ्रष्टाचाराची तक्रार करण्यास अनेकदा नागरिक धजावत नाहीत. अशा तक्रारदारांची ओळख गुप्त ठेवून त्यांना संरक्षण देण्याची गरज आहे. सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचाराबद्दल वरिष्ठ अधिकार्‍यांना जबाबदार धरल्यास लाचखोर कर्मचार्‍यांवर वचक बसू शकेल. भ्रष्टाचार दोन्ही बाजूंनी होतो. लहानपणापासून शाळेतून नैतिकतेचे धडे दिल्यास मी लाच देणार नाही, घेणार नाही ही वृत्ती तयार झाल्यास लाचखोरीला आळा बसेल. त्याचबरोबर भ्रष्ट अधिकार्‍याला सन्मान मिळण्याऐवजी त्याच्यावर सामाजिक बहिष्कारासारखे अस्त्र उगारल्यास लाच घेण्याची प्रवृत्ती कमी होईल. यातून लाचखोरी पूर्णपणे नष्ट करणे कठीण असले तरी मोठ्या प्रमाणात रोखणे शक्य होईल.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




उदा. चालताना पायात अडथळा येणाऱ्या वस्तू-रचना काढून टाकणे.
- आहार : बऱ्याच रुग्णांना अन्न भरवावे लागते. काही रुग्ण गिळू शकत नाहीत. त्यांना नळीद्वारे अन्न द्यावे लागते. या गोष्टी शिकाव्या लागतात किंवा प्रशिक्षित व्यक्ती मदतनीस म्हणून लागतात.- स्वच्छता : डोळे, तोंड व दात, नाक, त्वचा, जखमा इत्यादींची स्वच्छता सांभाळायला लागते. या गोष्टी रुग्णाला करून द्याव्या लागतात. - लघवी : अंथरुणात किंवा नकळत लघवी होणे ही एक मोठीच समस्या असते.

## २ Joke विनोद




एक डॉक्टर - तुमच्या दवाखान्यात असं कधी होतं का की एखादा रोगी एखाद्या रोगामुळे मरतो पण शवविच्छेदनात तो दुसऱ्याच रोगाने मेल्याचे कळते. दुसरा डॉक्टर - नाही, आमच्याकडे रोगी त्याच रोगाने मरतो, ज्या रोगासाठी आम्ही त्याच्यावर इलाज केलेला असतो.

## ३ Message संदेश



Apno ne zehar ka jaam de diya
Gairo ne bewafa naam de diya
Wo jo kehte they bhul na jana hame
Aaj unhone hi bhari MEHFIL ME ANJAAN keh diya...

## ४ Thought सुविचार




माझे ते खरे म्हणण्यापेक्षा खरे ते माझे म्हणा.
- अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**न व्याधिः न विषम् न आपत्तथा न आधिश्चभूतले ।**
**खेदाय स्वशरीरस्थं मौर्ख्यम् एकं यथानृणाम् ।।**

अर्थ : स्वतःचा मूर्खपणा माणसाला जितका खेदजनक असतो, त्याप्रमाणे आजार, विषय, संकटे आणि मनोव्यथासुद्धा दुःखदायक नसतात.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. लक्ष्मीचे वाहन
४. हिशेबात घोटाळा करून पैशाचा अपहार
९. 'अशी --- येती, आणिक स्मृती ठेवूनी जाती' (सुधीर फडके)
११. दहावी रास
१२. घट्ट
१३. घोड्याचे घर
१५. अनाथ
१७. आकाश, वस्त्र
१९. चकचकीत, स्वच्छ
२२. खर्चात कपात
२४. अव्यवस्थित कारभार
२५. पंख
२७. वाळवंट
२८. ही टाकणे म्हणजे नवीन रूप धारण करणे
२९. स्वीकार
३०. गार
३१. ओझ्याचा प्राणी
३२. बारीक मण्यांची माळ, देवीपुढची मशाल
३३. फळांपासून केलेले पेय
३५. दिवस
३७. भोळा याअर्थी शंकराचे नाव
३९. बंधन नसलेला
४१. अग्नी
४३. रोख रक्कम
४५. आल्या पावली लगेच
४८. चिंचेची चव
४९. बुटका, अरूंद तोंडाचा माठ
५०. बाज विणण्याची कापडी पट्टी
५२. आश्रय, टेकू
५३. कधी कधी पंख नसले तरी हे शक्य होते!
५४. प्रफुल्लित
५७. हात आणि दंड यांना जोडणारा भाग
५८. गाय
५९. वेदनेने भरलेले
६१. नेपाळमधील या नदीत 'शाळिग्राम' सापडतात
६३. तमाशात काम करणारा
६५. ज्योतिषानुसार नक्षत्रांची अनुकूलता
६७. संकट
६८. आठवण
६९. ही कधीही सांगून येत नाही!
७०. जाग येईल तीच खरी उगवतीची वेळ पण हिंदीत
७२. बदाम, पिस्ता, काजू इत्यादी
७३. डोंगरावरुन सतत पडणाऱ्या पाण्याचा प्रवाह
७५. अंकुर
७६. आमिरचा क्रिकेटपट
७७. गंगेची भगिनी (हिंदी)
७८. वशिला

### उभे शब्द

१. अर्धवर्तुळाकार
२. बगळा
३. भित्रा
४. अभिनेता
५. भेग
६. तप:सामर्थ्य
७. निमग्न, गुंग
८. हुशार, चाणाक्ष
९. मेणा
१०. रेषा
१४. शंकराला वाहण्याचे त्रिदल
१६. पूर्ण तापलेले, बहरातील
१७. एकत्र जेवण, --- पंगत
१८. रथातील प्रवासी
२०. पुकारा, हाळी
२१. बारा वर्षांचा काळ
२३. घंटेचा आवाज
२६. नाश पावणे
२८. नदीचा पाट
३१. सुखद थंडी
३२. कुबड
३३. एकंदरीने निवड न करता
३४. पाणकोंबडा
३६. नेहमी
३८. चूकच्या विरुद्ध
३९. पैशाला फुटणारा कोंब?
४०. फाजील उत्साह
४२. गरज
४४. कारस्थान
४६. झाडाला फुटलेली नवीन पाने
४७. नम्र, वाकलेला
४८. काळोख,४९. उंदराची चाहूल
५१. लायब्ररीला मराठी शब्द
५२. पाणी
५५. मुळाक्षरे,५६. सिद्ध
५७. गवत काढण्याचे हत्यार
६०. पुरेसा भक्कम
६२. देवलोकीचे गायक-वादक
६३. छोटी ताटली
६४. कवी
६६. धूर्त, लबाड
६८. प्रश्न
७१. सूरतालापासून भरकटलेले
७३. द्रव्य
७४. शुकसखी

### आडवे उत्तरे

१.घुबड ४.अफरातफर ९.पाखरे ११.मकर १२.दाट १३.तबेला १५.पोरका १७.अंबर १९.लखलखीत २२.काटकसर २४.गलथान २५.पर २७.रण २८.कात २९.अंगिकार ३०.शीतल ३१.गाढव ३२.पोत ३३.सरबत ३५.वासर ३७.सांब ३९.मोकळा ४१.दावानल ४३.रोकड ४५.सटकपावली ४८.आंबट ४९.खुजा ५०.नवार ५२.आधार ५३.उडणे ५४.टवटवीत ५७.कोपर ५८.गो ५९.यातनामय ६१.गंडकी ६३.तमासगीर ६५.तारकाबल ६७.बला ६८.सय ६९.वेळ ७०.सबेरा ७२.सुकामेवा ७३.धबधबा ७५.डीर ७६.लगान ७७.जमुना ७८.लग्गा

### उभे उत्तरे

१.घुमटाकार २.बक ३.डर ४.अदाकार ५.फट ६.तपोबल ७.रत ८.चलाख ९.पालखी १०.रेघ १४.बेल १६.रसरशीत १७.अंगत १८.रथारुढ २०.ललकारी २१.तप २३.टणत्कार २६.रसातळाला खाणे २८.कालवा ३१.गारवा ३२.पोक ३३.सरसरकट ३४.बदक ३६.सदा ३८.बरोबर ३९.मोड ४०.चेव ४२.नड ४४.कट ४६.पालवी ४७.लीन ४८.आंधार ४९.खुडबूड ५१.वाचनालय ५२.आप ५५.वर्णमाला ५६.तयार ५७.कोयता ६०.सबळ ६२.कीन्नर ६३.तबकडी ६४.गीतकार ६६.कावेबाज ६८.सवाल ७१.बेताल ७३.धन ७४.मैना




## थोडक्यात/ संक्षिप्त



### टीम इंडियाला मोठा धक्का, प्लेइंग इलेव्हनमधला खेळाडू तडकाफडकी घरी परतला!

**चेन्नई**–टी–२० वर्ल्ड कपच्या सुपर–८ च्या पहिल्याच सामन्यात टीम इंडियाला पराभवाला सामोरं जावं लागलं. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात भारताचा ७६ रननी पराभव झाला. या पराभवामुळे टीम इंडियाचं सेमी फायनलला पोहोचणं कठीण झालं आहे. सेमी फायनलला क्वालिफाय होण्यासाठी आता टीम इंडियाला त्यांचे उरलेले दोन्ही सामने जिंकावे लागणार आहेत. २६ फ ेब्रुवारीला भारताचा सामना झिम्बाब्वेविरुद्ध होणार आहे, तर १ मार्चला भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात सुपर–८ ची लढत होईल.टीम इंडियासाठी उरलेले दोन्ही सामने

### झिम्बाब्वेविरुद्धच्या मॅचआधीच बाहेर होणार टीम इंडिया!

**मुंबई**–टी–२० वर्ल्ड कपच्या सुपर–८ मधील ग्रुप–१ हा ग्रुप ऑफ डेथ ठरत आहे. या ग्रुपमध्ये भारत, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे या टीम आहेत. विजयाची प्रबळ दावेदार असलेल्या टीम इंडियाचा सुपर–८ च्या पहिल्याच सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ रननी दारूण पराभव झाला. या पराभवामुळे टीम इंडियासमोर सेमी फायनलपर्यंतही न पोहोचण्याचं संकट ओढावलं आहे.दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवानंतर टीम इंडियाचा नेट रनरेट मायनस ३.८०० झाला आहे, तर दक्षिण आफ्रिकेचा नेट रनरेट +३८०० आहे. वेस्ट इंडिजने झिम्बाब्वेचा १०७ रननी पराभव केल्यामुळे त्यांचा नेट रनरेट तब्बल +५.३५० झाला आहे. दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांच्या एवढ्या बलाढ्य नेट रनरेटमुळे भारताला नेट रनरेटच्या आधारावर सेमी फायनलला पोहोचणं कठीण झालं आहे, त्यामुळे त्यांना दक्षिण आफ्रिकेवर अवलंबून राहावं लागणार आहे.

### अफगाणिस्तानने नव्या कोचची केली घोषणा, पाकिस्तानचे माजी कोच मुख्य प्रशिक्षकपदी

**नवी दिल्ली**–जायंट किलर अशी ओळख मिळवलेल्या अफगाणिस्तान संघाला यंदाच्या टी–२० विश्वचषकातील प्राथमिक फेरीतून बाहेर पडावं लागलं आहे. अफगाणिस्तानने गट टप्प्यातील न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिकाविरूद्धचे सुरूवातीचे दोन्ही सामने गमावल्याने संघावर स्पर्धेबाहेर जाण्याची वेळ आली. दक्षिण आफ्रिकाविरूद्धचा सामना संघाने जेमतेम जिंकलाच होता, पण दोन सुपर ओव्हरमधील दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये संघाने सामना गमावला. यादरम्यान संघाचे कोच जोनाथन ट्रॉट यांचा कार्यकाळ संपल्याने टी–२० विश्वचषकानंतर ते संघापासून वेगळे झाले. आता नव्या कोचची नियुक्ती करण्यात आली आहे.

### ममी भारताच्या पराभवाने आनंदी...रवि शास्त्रीच्या वक्तव्याने क्रिकेट जगत हैराण

**मुंबई**–टी२० वर्ल्ड कप २०२६ मध्ये (ऊ२०`दीत् ण्ल्ज २०२६) भारताच्या पहिल्या पराभवानंतर भारतीय क्रिकेट फॅन्स चिंतेत आहेत की टीम इंडिया सेमी फायनलमध्ये स्थान मिळवू शकेल की नाही. तर दुसरीकडे टीम इंडियाचे माजी हेड कोच रवि शास्त्रीने एक मोठं वक्तव्य केलं असून त्यांनी म्हटलं की ते सुपर ८ मध्ये दक्षिण आफ्रिके विरुद्ध टीम इंडियाला मिळालेल्या पराभवानंतर खूप खुश आहेत. रवि शास्त्रीने हे सुद्धा म्हटलं की भारतासाठी हा झटका महत्वाचा होता. रवि शास्त्री पराभवाने खुश : अहमदाबादमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळवण्यात आलेल्या सामन्यात टीम इंडियाचं प्रदर्शन निराशाजनक होतं.

# पाकिस्तानला हरवत इंग्लंड संघ उपात्य फेरीत

आयसीसी टी –२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये प्रवेश करताच इंग्लंडने इतिहास घडवला आहे.

अहम आयसीसी टी –२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत मंगळवारी झालेल्या सामन्यात इंग्लंड आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना पाकिस्तानने १६४ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुकने दमदार शतकी खेळी केली. या शतकी खेळीच्या बळावर इंग्लंडने २ गडी राखून विजय मिळवला. हा सामना जिंकताच इंग्लंडने सेमी फायनलमध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे. सेमी फायनलमध्ये आपलं स्थान निश्चित करताच इंग्लंडने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.



**इंग्लंडने घडवला इतिहास**

या विजयासह इंग्लंडच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. इंग्लंडचा संघ हा सलग पाचव्यांदा आयसीसी टी –२० वर्ल्डकप स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये प्रवेश करणारा पहिलाच संघ ठरला आहे. याआधी कुठल्याही संघाला सलग पाच वेळा सेमी फायनलमध्ये प्रवेश करता आला नव्हता. याआधी पाकिस्तान आणि श्रीलंका या दोन्ही संघांनी प्रत्येकी ४–४ वेळा सेमी फायनलमध्ये प्रवेश केला होता. पाकिस्तानने २००७,२००९,२०१० आणि २०१२ मध्ये झालेल्या टी –२० वर्ल्डकप स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये प्रवेश केला होता. तर श्रीलंकेने २००९,२०१०,२०१२ आणि २०१४ मध्ये झालेल्या स्पर्धेत सेमी फायनलमध्ये प्रवेश केला होता.

टीम इंडियाकडे अजूनही सेमी फायनलमध्ये जाण्याची संधी! 'हे' आहेत ३ पर्याय

'लक्ष्मी निवास' मधील सोज्वळ सुनेचा स्पोर्ट्स ब्रा अनब पांढऱ्या शर्टमधील बोल्ड फोटोशूट चर्चेत इंग्लंडचा संघ २०२६ स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये प्रवेश करणारा पहिलाच संघ ठरला आहे. याआधी २०१६ मध्ये झालेल्या टी –२० वर्ल्डकप इंग्लंडने सेमी फायनलमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर २०२१,२०२२,२०२४ आणि २०२६ मध्ये सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे. २०२२ मध्ये झालेल्या टी –२० वर्ल्डकप स्पर्धेत इंग्लंडने अंतिम फेरीत पाकिस्तानला पराभूत करून जेतेपदाचा मान पटकावला होता. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानला ९ गडी बाद १६४ धावा करता आल्या. पाकिस्तानकडून फलंदाजी करताना साहिबजादा फरहानने ६३ धावांची खेळी केली. इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी १६५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडकडून कर्णधार हॅरी ब्रुकने नाबाद १०० धावांची खेळी केली आणि इंग्लडला २ गडी राखून विजय मिळवून दिला.

## बलात्काराची धमकी आणि बॉडी शेमिंग; डेव्हिड मिलरबरोबरच्या त्या व्हिडीओनंतर इन्फ्लुएन्सर लक्ष्य

दिल्ली–टी२० वर्ल्डकप स्पर्धेत, सुपर८ फ ेरीच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारतीय संघावर दिमाखदार विजय मिळवला. अर्धशतकी खेळी करणारा डेव्हिड मिलर या विजयाचा शिल्पकार ठरला. मिलरबरोबर सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सरने एक व्हीडिओ केला. गंमतीशीर अशा स्वरुपाचा हा व्हीडिओ होता. मात्र हा व्हीडिओ शेअर केल्यानंतर इन्फ्लुएन्सरला बलात्काराच्या धमक्या येऊ लागल्या. बॉडी शेमिंग अर्थात तिच्या शरीराला उद्देशून आक्षेपार्ह भाषेत शेरेबाजी होऊ लागली. या प्रकाराने व्यथित झालेल्या तिने फेसबुकवरून हे रील डिलिट केलं आहे.

आयसीसीने टी२० वर्ल्डकपच्या निमित्ताने अनेक सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सर्सना ताफ्यात समाविष्ट केलं आहे. सामन्याआधी, सामन्यानंतर ही मंडळी व्हीडिओ तयार करतात. काहीजण माजी खेळाडूंच्या मुलाखती घेतात. आरजे प्रिन्सी पारीख या इन्फ्ल्युएन्सरने हा सामना संपल्यानंतर डेव्हिड मिलरबरोबर एक व्हीडिओ केला. डेव्हिड मिलर, कमाल खेळाडू!असं या व्हीडिओला कॅप्शन होतं. व्हीडिओत इन्फ्ल्युएन्सर मिलरभोवती फेरी मारताना दिसते. मिलर, आपण मित्र होतो असं गंमतीत ती म्हणताना दिसते. मिलरने भारताला हरवण्यात निर्णायक भूमिका बजावली. त्यामुळे ती असं म्हणत होती.

हे रीळ शेअर केल्यानंतर बलात्काराच्या धमक्या आल्या तसंच बॉडी शेमिंग करण्यात आलं असं या इन्फ्लुएन्सरचं म्हणणं आहे. या प्रकाराने संतापलेल्या तिने फेसबुकवरून रीळ डिलिट केलं मात्र तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर हे रील उपलब्ध आहे. लवकरच यासंदर्भात पोलिसात तक्रार करणार असल्याचं तिने सांगितलं. प्रचंड अशा ट्रोलिंगमुळे मला आता गायब व्हावंसं वाटत आहे असं तिने संतापून म्हटलं आहे. कमेंट्स मध्ये मला धमक्या देण्यात आल्या. अतिशय हीन भाषेत टीका करण्यात आली. ही ग्राफिक्स मी सहन करू शकत नाही. अनेकांना मी ब्लॉक केलं आहे. मला अशा पद्धतीने त्रास देणाऱ्यांची नावं मी प्रसिद्ध करणार आहे.

अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या लढतीत दक्षिण आफ्रिकेने १८७ धावांची मजल मारली. डेव्हिड मिलरने ३५ चेंडूत ६३ धावांची खेळी केली. डेवाल्ड ब्रेव्हिसने ४५ तर ट्रिस्टन स्टब्जने ४४ धावा करत मिलरला चांगली साथ दिली.

भारतातर्फे जसप्रीत बुमराहने ३ तर अर्शदीप सिंगने २ विकेट्स पटकावल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना भारतीय फलंदाजांनी सपशेल शरणागती पत्करली. शिवम दुबेने ४२ धावांची खेळी करत थोडा प्रतिकार केला. दक्षिण आफ्रिकेने ७६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. मार्को यान्सनने ४ तर केशव महाराजने ३ विकेट्स घेतल्या. मिलरलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.आयपीएल स्पर्धेत खेळण्याच्या निमित्ताने भारतात खेळण्याचा पुरेसा अनुभव गाठीशी असणाऱ्या मिलरने शानदार खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.



सॅन फ्रान्सिस्को येथे एनबीएच्या नियमित हंगामाच्या सामन्यात भाग घेताना गोल्डन स्टेट वॉरियर्स आणि डेन्व्हर नगेट्सचे खेळाडू




इटलीतील मिलान येथे झालेल्या मिलान-कॉर्टिना ऑलिंपिक हिवाळी खेळांमध्ये हॉकी पुरुषांच्या सुवर्णपदकाच्या सामन्यानंतर आनंद साजरा करताना अमेरिकन खेळाडू.

## पाकिस्तान टी–२० विश्वचषकातून बाहेर


**पल्लेकेले :** आयसीसी टी–२० विश्वचषकाच्या सुपर–८ फेरीत पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात पल्लेकेले येथे अटीतटीचा सामना रंगला. हा सामना इंग्लंडने २ फलंदाज राखुन जिंकला. आणि टी–२० विश्वचषकाच्या उपांत्यफेरीत मजल मारली. पाकिस्तानचे मात्र टी–२० विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आले. या सामन्याआधी पाकिस्तानने नाणेफेक जिंकली होती. आणि प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. मात्र या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानच्या संघाने २० षटकांत १६४ धावा केल्या. यावेळी ९ फलंदाज बाद झाले. त्यामुळे इंग्लंडच्या संघाला १६५ धावांचे आव्हान मिळाले. इंग्लंडच्या गोलंदाजांपैकी आर्चर, जेमी ओव्हरटन यांनी प्रत्येकी २ बळी तर लियान डॉसन याने ३ बळी टिपले. आदिल रशीद याला १ गडी बाद करता आला. पाकिस्तानचा अनुभवी फलंदाज बाबर आझमचा त्रिफळा जेमी ओव्हरटन याने उडविला. सलामीवीर शबाज फरहान याने ६३ धावा करत अर्धशतक केले. इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूक याने दमदार शतक झळकावले. टी–२० विश्वचषकाच्या इतिहासात शतकी खेळी करणारा तो पहिला कर्णधार ठरला. पाकिस्तानच्या संघाने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडच्या संघाची सुरुवात खराब झाली. पण हॅरी ब्रूकने तिसर्या क्रमांकावर फलंदाजीला येऊन दमदार खेळी केली. टी–२० वर्ल्डपच्या आतापर्यंतच्या ९ हंगामात एकाही कर्णधाराला या स्पर्धेत शतक झळकावता आले नव्हते. संक्षिप्त धावफलक इंग्लंड : हॅरी ब्रूक १००, बटलर २, फिल सॉल्ट ०, जेबॉक बेथल ८,विल जॅक २८, टॉम २, सॅम करन १६, जेमी ०, आर्चर ५, लियाम १ एकूण १९.१ षटकांत १६६/८. सर्व बाद.

# तेंडुलकरला बाद दिल्याच्या निर्णयाचा पंच बकनर यांना बावीस वर्षांनी पश्चात्ताप

### त्यांना बॉक्सींगचे हॅन्डग्लोज द्यावे ज्याने चुकीचे निर्णय देणार नाहीतः सचिनची खोचक टिका



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेटमधील अलौकिक खेळाडू सचिन तेंडुलकरला पायचित ठरविण्याचा तो निर्णय चुकीचा होता अशी उपरती तो निर्णय देणारे पंच स्टीव्ह बकनर यांना तब्बल बावीस वर्षांनी झाली. दोन दशकांहून अधिक काळ जागतिक क्रिकेटमधील आदरणीय पंच म्हणून बकनर यांची ओळख होती. ते २००९ मध्ये निवृत्त झाले. आता वेस्ट इंडिज क्रिकेट पंच संघटनेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यातील एक आठवणही तेंडलकरला बाद देण्याच्या निर्णयाविषयी होती. आयुष्यातील सर्वात कठीण निर्णय कुठला असे या वेळी त्यांना विचारले असताना त्यांनी ब्रिस्बेनच्या मैदानावर २२ वर्षांपूर्वी झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात तेंडुलकरला पायचित देण्याचा निर्णय सर्वात कठीण होता असे सांगितले.



या निर्णयाविषयी आजही बोलले जाते. तो निर्णय म्हणजे माझी चूक होती. मी त्याला का बाद दिले? तो बाद कसा? वगैरे प्रश्न त्यानंतर उपस्थित झाले. पण, आयुष्यात माणसाकडून चुका होतच राहतात आणि मी ती चूक स्वीकारली आणि पुढे चालू राहिलो, असे बकनर म्हणाले.

तेव्हा जेसन गिलेस्पीचा चेंडू पॅडच्या वर लागला होता. बकनर यांना ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी केलेली अपील पटली आणि त्यांनी त्याला बाद ठरवले. मात्र, पुन्हा पाहिल्यानंतर चेंडू यष्ट्यांच्या वरून जात होता असे स्पष्ट दिसून आले. समालोचन करणाऱ्या टोनी ग्रेगसह प्रत्येकाने हा निर्णय भयानक असल्याचे सांगितले.

बकनर यांनी तेंडुलकरला चुकीच्या पद्धतीने बाद देण्याची ही काही एकमेव घटना नाही. ईडन गार्डन्सवर २००५ मध्ये पाकिस्तानविरुद्ध काहीच जणांनी अपील केल्यानंतरही तेंडुलकरला यष्टिरक्षकाकरवी झेलबाद ठरवले होते. यानंतर बॅट आणि चेंडूंमध्ये बरेच अंतर असल्याचे दिसून आले होते.

**तेंडुलकरचे मिश्कील उत्तर**

सचिन तेंडुलकरला २०२४ मध्ये एका मुलाखतीत पंच बकनर यांच्याशी असलेल्या नात्याविषयी विचारण्यात आले. मी फलंदाजी करताना बकनर यांना बॉक्सिंग ग्लोव्हज घालायला द्यावेत, जेणेकरुन तो बाद असल्याची खूण करू शकणार नाही, अशी मिश्कील टिप्पणी तेंडुलकरने तेव्हा केली होती.



# 'हिंद दी चादर' गुरु तेग बहादुर यांच्या '३५० व्या शहीदी समागम' निमित्त समूहगान कार्यक्रम

## - ५१ लाख विद्यार्थ्यांनी गायले समूहगान -बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड
## - संस्थेकडून हिंद दी चादर समूहगान कार्यक्रमाचीवर्ल्ड रेकॉर्ड म्हणून नोंद

**मुंबई/प्रतिनिधी :** हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमानिमित्त शाळा व महाविद्यांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज सिंग यांनी गुरू तेग बहादुर यांच्या जीवनावर आधारित गायलेले गीत आज कोकण विभागातील २० हजार शैक्षणिक संस्थामध्ये ५१ लाख विद्यार्थी आणि १.५ लाख शिक्षक व इतर कर्मचारी यांच्या सहभागातून समुहगान गायीले आहे. या उपक्रमाची बेस्ट ऑफ इंडिया रिकॉर्ड संस्थेकडून वर्ल्ड रेकॉर्ड म्हणून नोंद घेण्यात आली असल्याची माहिती राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांनी दिली आहे.

या उपक्रमात मुंबईतील सर्व महानगरपालिका प्राथमिक, माध्यमिक, खाजगी अनुदानित, विना अनुदानित व






अन्य मंडळांच्या एकूण दोन हजार ३२१ शाळांमध्ये सुमारे सात लाख विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. श्री गुरू तेग बहादुर यांच्या शौर्याचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी शिक्षण संस्था, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत आहेत. नवी मुंबई येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहनही त्यांनी या माध्यमातून केले आहे.

नवी मुंबई येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने कोकण विभागाअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, प्रभात फेरी, आरोग्य शिबीर तसेच समुहगान असे उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनकार्यावर आधारित सादर केलेले प्रेरणादायी गीत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्या सहभागातून सामूहिकरित्या गायन करण्यात आले. समूहगानातून गुरु तेग बहादूर यांच्या बलिदान व मानवतेच्या मूल्यांची आठवण उपस्थितांना करून देण्यात आली. विद्यार्थ्यांना या निमित्ताने सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात येते.

तसेच ठाणे जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये ''हिंद दी चादर''गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त समूहगान कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी वर्गाने विविध शाळांना भेट देऊन या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला व विद्यार्थ्यांना प्रेरित केले. कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांनी या उपक्रमात उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी दिलेले बलिदान हे देशाची संस्कृती, सभ्यता, विचारधारा आणि धर्म यांच्या रक्षणासाठी होते. त्यांचा पराक्रम, वीरता, शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने समाज या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येत आहे. त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा, यासाठी शहीदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांवर जावून श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शीख गुरूंचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम राज्य शासन करीत आहे.

## मिनार उर्दू शैक्षणिक संकुल येथे खरी कमाई व नवीन कार्यालयाचे उदघाटन



**लातूर (मोईज सितारी) :-** मिनार उर्दू शैक्षणिक संकुल, पटेल नगर, राज्याचे सहकार मंत्री तथा अहमदपूर चे लोकप्रिय आमदार बाबासाहेब मनोहरराव पाटील यांच्या शुभ हस्ते खरी कमाई व नवीन कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जुबैदिया एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष शेख अब्दुल रज्जाक महमदसाब (अत्तरवाले) हे होते तर प्रमुख पाहुणे हाजी जफर पटेल (जेष्ठ समाजसेवक) श्री. सरफराज पठाण, ( बँक), संस्थेचे उपाध्यक्ष श्री. शेख असलम अब्दुल रज्जाक, सय्यद सारीम, श्री. रसूल पटेल (सरपंच) अब्दुल रौफ अब्दुल रेहमान शेरीकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विद्यार्थी, पालकांना शिक्षण, आरोग्य, खरी कमाई. या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, इनामदार एम.एम.यांनी केले व आभार कासार रशीद यांनी व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका श्रीमती शेख अनिसा अब्दुल रज्जाक मुख्याध्यापक शेख इनाम मंजूरमिया, प्राचार्य, शेख असलम अब्दुल रज्जाक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# अण्णा हजारे ही एक व्यक्ती नसून एक विचार आहे : कल्पना इनामदार

**लातूर/प्रतिनिधी :** समाजात विविध समाजोपयोगी कामे अण्णा हजारे यांनीच केले पाहिजे असे नाही. अण्णा ही व्यक्ती नसून एक विचार आहे आणि तो विचार प्रत्येक जागरूक नागरिकाने आत्मसात केला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय लोकआंदोलन न्यासाच्या कार्याध्यक्षा कल्पनाताई इनामदार यांनी केले.

अण्णा हजारे प्रणित राष्ट्रीय लोकआंदोलन न्यासचे जिल्ह्यातील संघटन मजबूत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी गरजूंना अन्नधान्याचे किटही वाटप करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, एड. संतोष गिल्डा ,न्यासाचे जिल्हाध्यक्ष प्रा. तात्यासाहेब नंदवे, जिल्हा सचिव रामेश्वर सूर्यवंशी, खजिनदार दत्ताभाऊ आवारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लातूर जिल्ह्यातील दहाही तालुक्यातील तालुका अध्यक्षांना




इनामदार यांच्या हस्ते नियुक्ती पत्रे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या मार्गदर्शनात कल्पनाताई इनामदार यांनी आजमितीस संघटन किती महत्वाचे आहे याविषयी अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन केले. संविधानाचे निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका आणि संघटित व्हा असा संदेश दिला होता. त्या संदेशाचे महत्व आज पदोपदी जाणवत असल्याचे सांगून इनामदार यांनी आज देशातील सामान्य माणूस दिवसेंदिवस गरीब होत चालला आहे. देशाची आर्थिक स्थिती ढासळत चालली आहे. ही बाब चिंताजनक आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्यांना सामान्य नागरिकांशी काहीही देणे घेणे नसते. सामान्य मनुष्य कोणत्या स्थितीत जगतोय हे कोणत्याही सरकारला पडलेले नाही. आपली लढाई व्यवस्थेविरोधात आहे, कोणत्याही सरकारच्या विरोधात नाही. व्यवस्था बदलण्यासाठी संघटन बांधणी अतिशय गरजेचे आहे. अण्णा हजारे यांनी सामान्यांसाठी असंख्य कामे केली आहेत. देशात बदल घडवून आणण्याचे काम अण्णांनी केले आहे. प्रत्येक व्यक्तीने अण्णा हजारे यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे.संघटन माणसाला, समाजाला मजबूत करत असते. अण्णांचा विचार चालवणारी मंडळी सक्रिय राहिली पाहिजे. अण्णांनी कार्यकर्त्यांना जिवंत ठेवणे गरजेचे आहे. संघटन मजबुतीसाठी आपण संपूर्ण देशात दौरे करतो, असेही त्यांनी नमूद केले. संघटन मजबुतीसाठी लोकशिक्षण, समाज जागृती आणि सभासद नोंदणी आवश्यक असून त्यावर पदाधिकाऱ्यांनी भर द्यावा, असे आवाहन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, एड. संतोष गिल्डा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. तात्यासाहेब नंदवे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी विस्तृतपणे विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हातिमभाई शेख यांनी तर आभार प्रदर्शन रामेश्वर सूर्यवंशी यांनी केले. आभार प्रदर्शनात त्यांनी समाजाचे देणे लागतो या उद्देशाने स्वखर्चातून तब्बल दोन लाख रुपयांचे अन्नधान्य वाटप करून गोर गरीब गरजूंच्या उदरनिर्वाहाचा तात्पुरता प्रश्न मिटवल्याचे सांगितले. याप्रसंगी विकास खटके, असलम शेख, अनिकेत वलांडे, रवींद्र गायकवाड, राहुल गायकवाड, किशोर रणदिवे यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# श्री सिध्देश्वरास १००१ महिलांकडून रुद्राभिषेक

**लातूर/प्रतिनिधी :** महाशिवरात्रीचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानकडून यात्रा महोत्सव सुरु आहे. या महोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. याचाच एक भाग म्हणून श्री सिध्द्वेश्वरास १००१ महिलांकडून रुद्राभिषेक करण्यात आला आहे. यासाठी सुखदा मांडे, संजिवनी येरटे व वर्षा गोजमगुंडे यांनी पुढाकार घेतला होता.

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने सुरु असलेल्या यात्रा महोत्सवात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमासह शेतकयांसाठी व महिलांसाठीही कार्यक्रमांचे आयोजन होत आहे. यानिमित्ताने शहरातील १००१ महिलांना एकत्रित करून ग्रामदैवत श्री सिध्देश्वरास रुद्राभिषेक करण्यात आला. यावेळी या महिलांनी एक साथ एका सुरात अभिषेकाच्या निमित्ताने विविध मंत्रोच्चार केले. यामुळे देवस्थान परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झालेले पाहण्यास मिळाले. रुद्राभिषेकानंतर महिलांना श्री सिध्देश्वराची महाआरतीही केली. या कार्यक्रमासाठी शहरातील महिलांना एकत्रित आणण्याकरिता सुखदा मांडे, संजिवनी येरटे व वर्षा गोजमगुंडे यांनी पुढाकार घेतला होता. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल देवस्थानच्या वतीने या तिघींचाही यथोचित सत्कार करण्यात करून महाप्रसाद वाटप करण्यात आला.

## सोनाली कुलकर्णीच्या भावाचे निधन; अभिनेत्रीची भावूक पोस्ट, म्हणाली...

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी सिनेसृष्टीमधील लोकप्रिय अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सोनाली कुलकर्णीच्या अगदी जवळच्या व्यक्तीचं निधन झालं आहे. यासंदर्भात सोनालीनं स्वत: पोस्ट करत माहिती दिली आहे. मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णीचा चुलत भाऊ अनिरुद्ध याचं निधन झालं आहे. भावाच्या जाण्यानं खचलेल्या अभिनेत्रीनं समाज माध्यमावर इमोशन पोस्ट शेअर केली आहे. अनिरुद्धच्या जाण्यानं सोनालीसह तिच्या कुटुंबीयांवरही दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

सोनाली कुलकर्णीने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलंय की, ''आमचा अन्नूमा... हे जग सोडून तू एका चांगल्या ठिकाणी निघून गेलास. तुझ्या आत्म्याला शांती लाभो. तिकडे वेदनारहित नवीन आयुष्य मिळो. अध्यात्मिक, निरागस आणि जीव लावणारा असा मला माहीत असलेला सर्वात निर्मळ मनाचा व्यक्ती तू होतास. तुझं प्रत्येकासोबत छान नातं होतं. सगळ्यांवर निस्वार्थ प्रेम केलंस. सगळी गाणी तुला माहीत होती. तबला अगदी छान वाजवायचास...आणि तुझ्या हातचा चहा... तू जसा होतास तसाच राहिलास आणि सगळ्यांना प्रेम दिलंस. तुझ्यावर नेहमीच प्रेम करत राहू. ओम शांती''. सोनाली कुलकर्णीच्या पोस्टवर चाहत्यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. त्याचबरोबर सोनालीच्या भावाला श्रद्धांजली वाहिली आहे. अनेकांनी सोनालीच्या पोस्टवर कमेंट करुन तिचं सांत्वन केलं आहे.दरम्यान, मराठी सिनेसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री म्हणून सोनाली कुलकर्णी ओळखली जाते. तिने अनेक मराठी चित्रपटांसह हिंदी चित्रपटांमध्येही काम केलं आहे. त्यासोबतच सोनाली कुलकर्णीनं मल्ल्याळम फिल्ममध्येही काम केलं आहे.

# डीजीएमसी आणि पीआरएसआय मुंबई यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :** देवीप्रसाद गोएंका मॅनेजमेंट कॉलेज ऑफ मीडिया स्टडीज आणि पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय) मुंबई चॅप्टर यांच्यात उद्योगशैक्षणिक सहकार्य वृध्दिंगत करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे विद्यार्थ्यांना जनसंपर्क क्षेत्रातील व्यावसायिकांशी थेट संवाद, मार्गदर्शन व प्रत्यक्ष अनुभवाच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

मुंबईत झालेल्या कार्यक्रमात पीआरएसआय मुंबईच्या अध्यक्षा अनीता श्रीवास्तव आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अमी व्होरा यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी मीडिया कोर्स समन्वयक निलांक्षा सचदेवा, पीआरएसआय मुंबईचे सचिव डॉ. मिलिंद आवताडे आणि संयुक्त सचिव प्रा. दैवता पाटील उपस्थित होते.

या सहकार्याअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप, तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र, कार्यशाळा, परिषदा आणि पीआरएसआयच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. 'नालंदा' या विद्यार्थी मंचाच्या माध्यमातून उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दुवा अधिक बळकट करण्याचा उद्देश आहे.

अनीता श्रीवास्तव म्हणाल्या की, ''या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगातील अनुभव, व्यावसायिक नेटवर्क आणि बदलत्या रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळेल.'' तर डॉ. अमी व्होरा यांनी सांगितले की, ''हा करार म्हणजे शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल असून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरेल.''



देवीप्रसाद गोएंका मॅनेजमेंट कॉलेज ऑफ मीडिया स्टडीज हे राजस्थानि सम्मेलन एज्युकेशन ट्रस्टअंतर्गत कार्यरत असून मल्टिमीडिया अँड मास कम्युनिकेशन, फिल्म, टेलिव्हिजन अँड न्यू मीडिया प्रॉडक्शन, मॅनेजमेंट स्टडीज, ॲनिमेशन अँड व्हीएफएक्स तसेच डेटा सायन्स या अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते.

पीआरएसआय ही देशातील जनसंपर्क क्षेत्रातील अग्रगण्य व्यावसायिक संस्था असून नैतिक मूल्ये, व्यावसायिक कौशल्य आणि सातत्यपूर्ण शिक्षण यांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे.

## महाराष्ट्रच्या विद्यार्थ्यांनी घेतला प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाजाचा अनुभव

**निलंगा/प्रतिनिधी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाची प्रत्यक्षात माहिती मिळावी या उद्देशाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.एन.कदम व उपप्राचार्य डॉ.बी. एस. गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार स्थानिक न्यायालयास अभ्यास भेट दिली. या अभ्यास भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी न्यायालयीन प्रक्रिया, विविध प्रकरणांची सुनावणी, तसेच न्यायालयातील कामकाजाची पद्धत जवळून पाहिली व अनुभवली.

या भेटीदरम्यान न्यायालयातील न्यायाधीश श्री. एस. बी.पवार, श्री. आर. व्ही. पांडे, अधिकारी व वकीलांनी विद्यार्थ्यांना न्यायालयीन रचना, खटल्यांची सुनावणी, पुरावे सादर करण्याची प्रक्रिया, मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्य, माहिती अधिकार ,तसेच न्यायालयाचे समाजातील महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या दरम्यान विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेल्या विविध प्रश्नांची उत्तरे न्यायालयातील



अधिकाऱ्यांनी दिली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. अशा अभ्यास भेटींमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभव मिळतो, आणि कायद्याविषयी जागरूकता वाढीस लागते. विद्यार्थ्यांनीही ही भेट अभ्यासपुरक व ज्ञानात भर टाकणारी असल्याचे मत व्यक्त केले.

या अभ्यास भेटीत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी व लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ.व्ही.पी.सांडूर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.एस.एस.बदनाळे , प्रा.माने पोर्णिमा, प्रा. सातपुते पूनम आदींनी प्रयत्न केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९

# आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू : १० मार्चपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

धाराशिव दि.२४ फेब्रुवारी (जिमाका) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यानुसार (RTE) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी स्वयंअर्थसहाय्यित व विना अनुदानित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.या प्रवेशासाठी १७ फेब्रुवारी २०२६ ते १० मार्च २०२६ या कालावधीत https://student.maharashtra.gov.in/admšportalý या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरण्याची प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

पालकांनी केवळ एकच ऑनलाईन अर्ज भरावा.अर्ज भरताना शाळेपासून घरापर्यंतचे अंतर गुगल मॅपद्वारे अचूक नोंदवावे. निवासाचा पत्ता,जन्मदिनांक, जातीचा दाखला,उत्पन्नाचा दाखला,फोटो आयडी,दिव्यांग प्रमाणपत्र इत्यादी माहिती अचूक व खरी भरावी.चुकीची माहिती भरल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.तसेच प्रवेशासाठी विचारपूर्वक १० शाळांची निवड करावी.

वंचित गटात अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,वि.जा.(अ),भटक्या जमाती (ब),भटक्या जमाती (क),भटक्या जमाती (ड),इतर मागासवर्ग (OBC),विशेष मागास प्रवर्ग (SBC),दिव्यांग,अनाथ तसेच एच.आय.व्ही.बाधित/प्रभावित बालकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

मागासवर्गीय बालकांसाठी वडील किंवा बालकाचा जातीचा दाखला तहसिलदार किंवा उपजिल्हाधिकारी यांचा असावा. परराज्यातील जातीचा दाखला ग्राह्य धरला जाणार नाही. दुर्बल गटामध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ किंवा २०२४-२५ मधील वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा कमी असलेला तहसिलदाराचा उत्पन्न दाखला आवश्यक आहे.पगारदार पालकांसाठी कंपनी किंवा मालकाचा पगाराचा दाखलाही ग्राह्य धरला जाईल.

निवासी पुराव्यासाठी संबंधित कार्यक्षेत्रातील स्वतःच्या मालकीच्या निवासाबाबत रेशन कार्ड,ड्रायव्हिंग लायसन्स,बीएसएनएल टेलिफोन देयक, प्रॉपर्टी टॅक्स देयक/घरपट्टी,मतदान ओळखपत्र,पासपोर्ट किंवा राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरला जाईल.स्वतःचे घर नसल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचा फॉर्म भरण्याच्या दिनांकापूर्वी किमान ११ महिन्यांचा किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार आवश्यक आहे.भाडेकरारातील पत्त्यावर वास्तव नसल्यास पालकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.जन्मतारखेचा पुरावा म्हणून ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका/अंगणवाडी/बालवाडीचा दाखला तसेच पालकांचे स्वयंनिवेदन ग्राह्य धरले जाईल.

दिव्यांग बालकांसाठी जिल्हा शल्यचिकित्सक किंवा वैद्यकीय अधीक्षक यांचे किमान ४० टक्के दिव्यांगत्व प्रमाणपत्र आवश्यक आहे. अनाथ बालकांसाठी बालसुधारगृहाची कागदपत्रे आवश्यक राहतील. घटस्फोटीत महिलांसाठी न्यायालयीन निर्णय किंवा न्यायप्रविष्ट प्रकरणाचा पुरावा तसेच बालकांच्या आईचे संबंधित अभिलेख आवश्यक आहेत. विधवा महिलांसाठी पतीचा मृत्यू दाखला व इतर आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतील.एकल पालक (सिंगल पॅरेंट) पर्याय निवडल्यास संबंधित बालकाचे पालकत्व स्वीकारलेल्या व्यक्तीची आवश्यक कागदपत्रे ग्राह्य धरली जातील.

आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरताना खालील कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे.आई किंवा वडिलांचे आधारकार्ड (अनाथ बालकांच्या बाबतीत सांभाळ करणाऱ्या पालकांचे आधारकार्ड) बालकाचे जन्म प्रमाणपत्र व वास्तव्याचा पुरावा.भाडे तत्त्वावर राहणाऱ्यांसाठी नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत. सामाजिक वंचित घटकांसाठी जातीचा दाखला व अपंगत्व प्रमाणपत्र (परराज्यातील दाखले ग्राह्य नाहीत). आर्थिक दुर्बल गटासाठी २०२३-२४ किंवा २०२४-२५ मधील १ लाखांपेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला.पालकांना ऑनलाईन प्रवेश मिळाल्याचा एसएमएस प्राप्त झाल्यानंतर अलॉटमेंट लेटर स्वतःच्या लॉगिनवरून डाउनलोड करून गटशिक्षण कार्यालयाच्या पडताळणी समितीकडे अर्ज व कागदपत्रांसह सादर करावे.

पात्र ठरल्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे पत्र घेऊन संबंधित शाळेत प्रवेश निश्चित करावा.पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता आरटीई पोर्टलवरील सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करावे.अधिक माहितीसाठी किंवा अडचणींसाठी गटशिक्षण कार्यालय किंवा शिक्षण विभाग (प्राथमिक) कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) रवींद्र खंदारे यांनी केले आहे.

# अवकाळीचा ज्वारी, कांद्यासह रब्बीच्या पिकांना तडाखा



धाराशिव -मागील आठवडाभरात सकाळी गारठा दुपारी उन्हाचे चटके बसत होते. कमाल तापमान ३५ अंशापर्यंत गेले होते. मात्र, मागील सोमवारी पहाटे हलक्या सरी कोळसल्या. सायंकाळी मेघगर्जनेसह हलका पाऊस झाला.ढगाळ वातावरण व पावसाचा द्राक्ष बागा, आंबा पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिना उजाडताच किमान तापमानात चढ-उतार जाणवू लागत होता. पहिल्या आठवड्यात गारठ्याचे प्रमाण अधिक होते. त्यानंतर कमाल तापमानात हळूहळू वाढ होत असल्याने सकाळी गारठा असला तरी दुपारी उन्हाचे चटके बसत होते. किमान तापमान १६ अंशांवरून १९ अंशाच्या पुढे सरकले होते. कमाल तापमानही ३४ ते ३५ अंशांवर राहत आहे. दोन दिवस ढगाळ व हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली होती. सोमवारी पहाटे हलक्या सरी झाल्या. त्यानंतर सायंकाळी ढगाळ वातावरण होते. ६.३० वाजल्यानंतर वादळी वारा, मेघगर्जनेसह हलक्या सरी कोसळत होत्या. अचानक झालेल्या पावसामुळे काढलेला हरभरा सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. येत्या काही दिवसात पावसाने तडका दिल्यास फटका बसण्याची शक्यता आहे.

खरिपानंतर आताही नुकसान गतवर्षी तब्बल पंधरा दिवस अगोदर पावसाने जोरदार हजेरी लावली होती. खरिपातील तूर, उडीद, मूग, सोयाबीन, बाजरी ही पिके काढणीला येताच ऑक्टोबर-नोव्हेंबरमध ये तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. त्यामुळे पिकाबरोबर शेतातील माती वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. आता रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा, कांदा पिकांची काढणी सुरू असून, पिके काढून टाकली आहेत. तुळजापूर तालुक्यासह काक्रंबा परिसरात सोमवारी (दि. २३) पहाटे पावणे सहा वाजेपासून जवळपास अर्धा तास अवकाळी पावसाने चांगले झोडपून काढल्याने रब्बी हंगामातील काढणीस आलेल्या व शेतात काढून टाकलेल्या शेती पिकासह कांदा फळबागांना जबर फटका बसला आहे. त्यामुळे भल्या पहाटेच शेतकऱ्यांची अवकाळीने झोप उडवली असून, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या रब्बी हंगामातील पिके व फळबागांचे पंचनामे प्रशासनाने तातडीने करण्याची मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमधून होत आहे.

तुळजापूर तालुक्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून वातावरणात बदल झाला आहे. ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने विशेषतः द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. तर दुसरीकडे हवामान खात्यानेही तीन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. सोमवारी पहाटे पावणे सहापासून तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा, अपसिंगा, कामठा, कात्री, मोर्डा, तडवळा, बारूळहोनाळा, वडगावलाख, खंडाळा, काक्रंबावाडी, हंगरगा तुळ, कार्ला, वानेगाव, जवळगा मे, वडगाव देव, सलगरा, किलज, मंगरूळ, सिंदफळ, ढेकरी, शिराढोण, कुंभारी आदी गावांसह तालुक्यातील अनेक गावांना जवळपास अर्धा तास अवकाळी पावसाने चांगले झोडपून काढले आहे. सध्या रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा, कांदा ही पिके काढणीस आली आहेत. अनेक शेतकऱ्यांनी पिकांची काढणी सुरू केली असून, शेतात गहू, ज्वारी, हरभरा, कांदा पिके काढून टाकली आहेत, अशातच सोमवारी पहाटे अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने रब्बीतील काढणीला आलेल्या व काढून टाकलेल्या पिकांना या अवकाळी पावसाचा जबर तडाखा बसला आहे. शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करून जोपासलेल्या व हातातोंडाशी आलेल्या द्राक्ष बागेला अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. प्रतिनिधी । तुळजापूर तुळजापूर शहर आणि परिसरात सोमवार (दि. २३) पहाटे जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. सुमारे अर्धा तास झालेल्या जोरदार पावसाने काढणीला आलेले गहु, ज्वारी, हरभरा आदी रब्बी पिकासह कांदा, आंबा, द्राक्ष बागांचे नुकसान झाले आहे. शहर आणि रविवार दिवसभर ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. यामुळे कडाक्याचा उन्हापासून दिलासा मिळाला असला तरी सोमवारी पहाटे जोरदार पावसाने हजेरी लावल्याने काढणीला आलेले गहु, ज्वारी, हरभरा आदि रब्बी पिकासह कांदा, आंबा, द्राक्ष बागांचे नुकसान झाले असुन शेतकऱ्यांचा हाता तोंडांशी आलेला घास हिरावला आहे.


# जाहीर लिलावाची दरपत्रक सुचना

मा. कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१, धाराशिव हे या विभागाच्या अखत्यारीतील मसला ते सिंदफळ कालवा ता. तुळजापुर जि. धाराशिव कामासाठी संपादित झालेल्या क्षेत्रामधील फळ झाडे/वन झाडे विक्रि करिता इच्छुकांकडुन मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

कोरी दरपत्रके कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयामध्ये **दिनांक** २६/०२/२०२६ ते **दिनांक** ०४/०३/२०२६ या कालावधी मध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११:०० ते दुपारी १६:०० वाजेपर्यंत रु. १००/- रोख भरणा केल्यावर देण्यात येतील.

सदर कामाची मोहोरबंद दरपत्रके (सर्व झाडांची उक्त किंमत दर्शविणारी बाबवार दरपत्रके) **दिनांक ०४/०३/२०२६ रोजी दुपारी १३:०० वाजेपर्यंत** निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात शासकिय सुट्टीचे दिवस वगळून स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी इच्छुक उपस्थितांसमोर संध्याकाळी १५:०० वाजता उघडण्यात येतील.

सविस्तर दरपत्रक सुचना या कार्यालयाच्या सुचना फलकावर पाहावयास मिळेल.

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. १, धाराशिव**
**जा.क्र. कृमबांविक्र. १ /भांशा / ५११ / २०२६.**
**दिनांक : २३/०२/२०२६**

**स्वाक्षरीत/-**
**(अ.आ. नाईक)**
**कार्यकारी अभियंता**
**कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. १**
**धाराशिव**

जिमाका/एके/जाहि/१४७


## ५४ क्विंटल सोयाबीन एकुण २,७०,००० किंमतीचे पिकअप मध्ये घेवून विक्री केले

उमरगा(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत ज्ञानेश्वर रा. गुंजोटी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२१.०१.२०२६ रोजी ०९.०० ते दि. २९.०१.२०२६ रोजी बाजारपेठ गुंजोटी उमरगा येथे फिर्यादी नामे- दिपक प्रभाकर काळे, रा.गुंजोटी ता. उमरगा जि. धाराशिव यांचे कडून नमुद ज्ञानेश्वरने सोयाबीन ठेवलेल्या पत्र्याचे शेडची चावी विश्वासाने घेवून अविश्वासाने गोडावुनमधील २०० पाकीटापैकी ९० पाकीटे एकुण ५४ क्विंटल सोयाबीन एकुण २,७०,००० किंमतीचे पिकअप मध्ये घलून घेवून जावून विक्री करुन फसवणुक केली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दिपक काळे यांनी दि.२३.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे उमरगा येथे गुन्हा नोंदवला आहे.

## चालक पोलीस शिपाई भरती बाबत सुचना

धाराशिव-पोलीस अधीक्षक धाराशिव यांच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या चालक पोलीस शिपाई (२५) पदांच्या भरती प्रक्रियेसाठी मैदानी चाचणी दिनांक १७/०२/२०२६ ते २७/०२/२०२६ पर्यंत आयोजित करण्यात आली आहे.त् अनुषंगाने सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, चालक पोलीस शिपाई भरतीचा दिनांक २७/०२/२०२६ हा शेवटचा दिवस आहे. तसेच दिनांक १७/०२/२०२६ ते २४/०२/२०२६ या कालावधीत ज्या उमेदवारांना मैदानी चाचणी करिता काही कारणामुळे हजर राहता आले नाही, तसेच दि. २५/०२/२०२६ रोजी हजर राहू शकले नाहीत त्यांनी कारणासह दिनांक २६/०२/२०२६ व २७/०२/२०२६ रोजी मैदानी चाचणी करिता सकाळी ०८.०० वाजेपर्यंत हजर रहावे.त्यानंतर आलेल्या उमेदवारांचा विचार करण्यात येणार नाही. त्यानंतर चालक पोलीस शिपाई पदाची मैदानी चाचणी घेण्यात येणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

# धाराशिवमध्ये १ मार्च रोजी भव्य विधी सेवा शिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

धाराशिव दि.२४ फेब्रुवारी (जिमाका) राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण,मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,धाराशिव,जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव व जिल्हा परिषद, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ मार्च २०२६ रोजी श्री तुळजाभवानी क्रीडा संकुल,धाराशिव येथे भव्य विधी सेवा शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.न्यायमूर्ती श्री.शैलेश ब्रम्हे,उच्च न्यायालय मुंबई,खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायमूर्ती धाराशिव यांच्या हस्ते, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती.अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष व पोलीस अधीक्षक श्रीमती.रितू खोखर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा महामेळावा होणार आहे.

विविध स्टॉल्सच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती वंचित,दुर्बल व गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे व त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हे या महामेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. मेळाव्यात जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद अंतर्गत विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत.

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय,पशुसंवर्धन कार्यालय,आरोग्य विभाग,शिक्षण विभाग,कृषी विभाग, समाजकल्याण विभाग,महिला व बालविकास विभाग,मत्स्यव्यवसाय विभाग,आदिवासी विकास विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) तसेच इतर संबंधित विभागांमार्फत विविध योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे.या महामेळाव्यात विविध कायदेविषयक अधिकार व शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असून,पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ वितरणही करण्यात येणार आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती अभिश्री देव व सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू व्यक्तींनी उपस्थित राहून शासकीय योजनांचा तसेच मोफत विधीसेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले आहे.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SYED ATAULLAH**
TO: **SAYYED ATAULLA SHAHBODDIN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **SAYYED ATAULLA SHAHBODDIN** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **SYED.ATAULLAH**
NEW NAME :- **SAYYED ATAULLA SHAHBODDIN**

Address - Inamdar Galli Nagar Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar no.-743916025523
Mob.8888219168



# लातूर समाचार धाराशिव
## बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


## धाराशिव येथून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अरुण भिमराव पवार, वय ५८ वर्षे, रा. पाटबंधारे कॉलनी समता नगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे १५,००० किंमतीची मोटरसायकल ही शिवाजी महाराज चौक येथील जवाहर फुलाचे दुकानासमोर धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अरुण पवार यांनी दि.२१.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२१ फेब्रुवारी रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १८४ कारवाया करुन १,४०,५०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649